# पंचधारा

(पाच कर्तबगार महिलांची माहिती)

प्रभाकर दिघे

BVBK-0401795

मीनल प्रकाशन
कोल्हापूर.

प्रकाशक :

संजय रामचंद्र लिमये
मीनल प्रकाशन,
२७९१ अे, वरुणतीर्थ,
कोल्हापूर–४१६ ०१२.

मुद्रक :

पां. ल. गोगावले
श्री गणेश मुद्रणालय,
३५७ शनवार पेठ, पुणे ३०.

© सौ. मोहना प्रभाकर दिघे

प्रकाशन तिथी :
८ फेब्रुवारी १९८५

मूल्य : नऊ रुपये

# उगम

राजकारण साहित्य आणि शास्त्रिय संशोधन ह्या तीन क्षेत्रातल्या पाच कर्तबगार महिला. म्हणजेच पंचधारा. यातली राणी क्लिओपात्रा म्हणजे धडाडत, खळाळत, कोसळत जाणारी एक धारा. कादंबरीकार हॅरिएटने आपल्या साहित्याद्वारे अमेरिकेच्या राजकारणात उलथापालथ घडवून आणली तेव्हा ती सुद्धा एक तुफान धारा. महाराणी व्हिक्टोरिया ही शांत आणि संथ वाहणारी धारा. एलिझाबेथ कोमल मनाची एक विकलांग कवयित्री. तिच्या जीवनात रॉबर्ट ब्राऊनिंगच्या रूपाने वसंत ऋतु अवतरला. ती एक हसणारी, नाचणारी धारा. आणि शास्त्रिय संशोधनाचे अविरत परिश्रम करणारी मारी क्युरी म्हणजे एक झपाटलेली झारा. अशा ह्या पंचधारा !

कुमार वाचकांना माझे हे पुस्तक आवडल्याशिवाय रहाणार नाही अशी माझी खात्री आहे.

प्रभाकर दिघे
१।३ जीवनग्राम, कळवा,
ठाणे ४००६०५.

माझी छोटी नात

चि. बीना मनमोहन कोर्डे

हिला आशिर्वादपूर्वक

— लेखक

अनुक्रम —


१. राणी क्लिओपात्रा / १

२. कादंबरीकार हॅरिएट / १४

३. महाराणी व्हिक्टोरिया / २५

४. कवयित्री एलिझाबेथ / ३६

५. संशोधक मारीक्युरी / ४८

म. ग्रं. सं. ठाणें, शासनालय शाखा.
बाल वाङ्मय
वा. क्र. १७८५ दिनांक ३।५।८९
विषय आं. वा

# राणी क्लिओपात्रा

ख्रिस्तपूर्व सन ६८ मध्ये, राजवाड्यातील आणि राजकारणातील घालमेलीतच क्लिओपात्राचा जन्म झाला. तिचे बालपण कसे काय गेले, ह्याबद्दल इतिहासाने मौन पाळले आहे. अठराव्या वर्षी तिचे पिताजी 'अकरावे टॉलेमी' यांनी ह्या जगाचा निरोप घेतला आणि तीच राज्याची राणी बनली. तिचा दहा वर्षांचा भाऊ 'बारावा टॉलेमी' याच्याबरोबर ती राज्याचा गाडा हाकू लागली. पुढे राजवाड्यातील दुष्ट राजकीय त्रिकुटाच्या कटकारस्थानाला तिचा तो भाऊ बळी पडला. आणि राणी क्लिओपात्रावर हद्दपार होण्याची पाळी आली. तरीसुद्धा ती हातपाय गाळून स्वस्थ बसली नव्हती. तिचा आत्मविश्वास दांडगा.

आपले गमावलेले सिंहासन परत मिळविण्यासाठी, तिने सैन्याची जमवाजमव केली. रूक्ष, ओसाड आणि रेताड वाळवंटातून मजल दरमजल करीत ती स्वारीवर निघाली.

ख्रिस्तपूर्व ६८ व्या वर्षी, तिची आणि ज्युलियस सीझरची गाठभेट झाली. पॉम्पी ह्या आपल्या रोमन सेनापतीचा जारीने पाठलाग करीत तो इजिप्त देशापर्यंत येऊन पोचलेला. पॉम्पी हा त्याचा प्रतिस्पर्धी. राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठीच त्याने

हा संघर्ष चालविलेला. रोम शहरामध्ये एक शतकभर ही अशी राजकीय धामधूम आणि उलथापालथ चालू राहिलेली.

क्लिओपात्रा ही त्रिभुवन– सुंदरी होती असे म्हणतात. परंतु ह्या म्हणण्याला काडीचासुद्धा ऐतिहासिक आधार नाही. तिच्या मृत्यूनंतर जवळजवळ दीड हजार वर्षांनी, तिचा एक अर्धपुतळा इतिहास संशोधकाच्या हाती लागला. उत्खननात सापडलेल्या त्या पुतळ्यावरून असा निष्कर्ष काढण्यात आला की, तिचे नाक धारदार होते. आणि सुंदर आकार असलेल्या ओठांनी तिच्या तोंडाला शोभा आणली होती.

परंतु अनेक इतिहासकारांनी, ऐतिहासिक आधार नसताना-सुद्धा, तिच्या अप्रतिम आणि असाधारण सौंदर्याचे वर्णन केलेले आढळते. त्यापैकी एकाही इतिहासकाराने तिला प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी कधी पाहिलेले नव्हते. तोंडातोंडी आणि कर्णोपकर्णी चालत आलेली ती कहाणी.

प्लुटार्चने केलेले ह्या राणीचे वर्णन कदाचित खरे असेल. प्लुटार्चच्या आजोबाला एका वैद्यबुवांनी तिच्या सौंदर्याचे वर्णन सांगितले. त्या वैद्यबुवाचा आणि राजवाड्यातील एका बल्लवा-चार्याचा परिचय होता. तो बल्लवाचार्य राजवाड्यात राणीसाठी भोजनप्रबंध करीत असे. म्हणजे त्याने राणीला प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीच पाहिलेले.

प्लुटार्चने लिहिले आहे की, ‘ राणीचे सौंदर्य इतके काही अप्रतिम आणि असामान्य नव्हते, की ज्या सौंदर्याची दुसऱ्या कुणा स्त्रीच्या सौंदर्याबरोबर तुलना करता येणार नाही. ’

पूर्वीच्या इतिहासकारांनी तिच्या आवाजाची आणि संभा-षणचातुर्याची वारेमाप स्तुती केलेली आढळते. परंतु ही गोष्ट खरी

की, राणी क्लिओपात्राला एकंदर सहा भाषा अवगत होत्या. शिवाय तिने ग्रीक इतिहास, साहित्य आणि तत्त्वज्ञान यांचा उत्तम अभ्यास केला होता. राजकीय वाटाघाटी करण्यात जी बरीच कुशल होती तिने आखलेल्या योजना आणि खेळलेले डावपेच अगदी बिनतोड असत. नाटचपूर्ण अशी कृती करण्यात तिचा हातखंडा होता. ती शूर, पराक्रमी आणि निधडचा छातीची होती. आपल्या बुद्धिमत्तेचा तिने पुरेपूर उपयोग केला. रोमन लोकांनी आपला इजिप्त देश घशात घालू नये म्हणून तिने तो संग्राम केला, त्यावरून तिचा पराक्रम आणि तिची बुद्धिमत्ता प्रकर्षाने दिसून येते.

अलेक्झांडर शहर घेतल्यानंतर ज्युलियस सीझरने, क्लिओ-पात्राला राजवाडचात भेटीला बोलावले. त्याच्या भेटीला ती उघडपणे गेली नव्हती, संध्याकाळच्या वेळी एक भले मोठे गालिचाचे गुंडाळलेले गाठोडे सीझरच्या राजमहालाकडे नेण्यात आले. त्याच गाठोडचात क्लिओपात्राने स्वतःला गुंडाळून घेतले होते. ती त्या गाठोडचात लपली आहे असा कुणालाच कधी संशय आला नाही. मारेकऱ्यांना चकविण्यासाठीच तिने हा मार्ग अवलंबीला असावा.

तिच्या ह्या नाटचपूर्ण कृतीमुळेच सीझर प्रभावित झाला. आणि त्याने तिला पुन्हा तिच्या सिंहासनावर बसविण्याचे ठरविले.

सीझरची आणि तिची पुढील भेट कशी झाली पहा. इजिप्त देशाची अफाट संपत्ती, अमाप वैभव यांचे शाही पाव्हण्या-पुढे प्रदर्शन करण्यासाठी क्लिओपात्राने नाईल नदीवर एक जंगी समारंभ आयोजित केला. एक हाऊसबोट म्हणजे गृहनौका नदीच्या

पाण्यावर तरंगत होती. शाही इतमामाची ती गृहनौका. कोणत्याच सुखसोईची तेथे उणीव नव्हती. त्या गृहनौकेवर सीझर इतका खूष झाला की, त्याने आठवडेच्या आठवडे त्या नौकेवर मुक्काम केला. शूरवीर ज्युलियस सीझर आणि चतुर क्लिओपात्रा ह्या दोघांनी तेथे आपला सारा वेळ मौजमजेतच घालविला.

त्या दोघांची सरबराई करण्यासाठी नाईल नदीवर छोट्या मोठ्या चारशे नौका सुसज्ज ठेवल्या होत्या. सरबराईसाठी लागणारे सामान त्या नौकांत गच्च भरलेले होते.

त्या वर्षीच्या जून महिन्यात क्लिओपात्राला एका पुत्ररत्नाचा लाभ झाला. त्या मुलाचे नाव तिने ‘ सीझरीयन ’ ठेवले. रोम आणि इजिप्त यांचे संयुक्त साम्राज्य स्थापन करावे असाच तिचा मानस. त्या साम्राज्यावर ज्युलियस सीझर आणि क्लिओपात्रा अशा दोघांनी राज्य करायचे असा बेत ठरला. आपलेच वंशज पुढे त्या साम्राज्यावर आधिपत्य गाजवीत रहातील अशीच त्या दोघांची महत्त्वाकांक्षा. पुत्रजन्माचा सोहळा पार पडल्यावर, सीझर अलेक्झांड्रियामधून बाहेर पडला आणि त्याने आशिया मायनरमध्ये धामधूम सुरू केली. तशीच दक्षिण आफ्रिकेत त्याने धडक मारली. आणि शत्रूचा नि:पात केला. ह्या अवधीत एकमेव हुकुमशहा म्हणूनच तो रोमला परत आला. क्लिओपात्रा आपल्या लाडक्या सीझरीयनला घेऊन अलेक्झांड्रियातील राजवाड्यातच राहिली. रोमची महाराणी म्हणून ती जगावर आपली प्रतिमा उमटविणार होती.

रोममधील नाणी पाडण्याची टांकसाळ सुधारण्यासाठी तिने अलेक्झांड्रियामधून नाणी पाडणारे हुषार तंत्रज्ञ आणि कारागीर पाठविले. रोमची करव्यवस्था सुधारण्यासाठी अले-

क्झांड्रीयातल्या अर्थपंडितांना पाचारण केले. रोमन पंचांगात तिने ज्योतिष्यांकडून सुधारणा घडवून आणली.

ज्युलियस सीझरने व्हीनसच्या मंदिरात क्लिओपात्राचा एक पुतळा बसविला. त्याने ' व्हीनस ' आणि ' इरोस ' यांच्या प्रतिमा असलेले एक नाणे पाडून घेतले. परंतु त्या प्रतिमेत, सीझरीयन ह्या छोटयाला हातावर घेतलेली, क्लिओपात्राच दिसून आली.

सीझर हा आता सर्वसत्ताधीश बनलेला. त्याची सत्ता सर्वदूर पसरलेली. क्लिओपात्रा एक वर्ष आणि आठ महिन्यांनी रोमला परत आली तेव्हा रोममध्ये एक विलक्षण धक्कादायक घटना घडलेली तिला आढळली. घटना पाहिल्यावर तिला घेरी आली. जागच्याजागी ती थबकून उभीच राहिली. ' इडिस ऑफ मार्चवर ' तला ज्युलियस सीझरचे कलेवरच पाहायला मिळाले. सीझरचा खून करण्यात आला होता.

इथेच क्लिओपात्राच्या वादळी जीवनातले एक पर्व समाप्त झाले.

सीझरच्या ह्या अशा आकस्मित मृत्यूमुळे तिच्यावर काय परिणाम झाला हे आपल्याला कळायला मार्ग नाही. कारण इतिहासाने त्याबाबत मौन पाळले आहे. अवघ्या एका महिन्याच्या आतच ती रोम सोडून इजिप्तला परत गेली. तिच्या पुढील तीन वर्षांच्या कारकिर्दीबाबतही इतिहासाने मौनव्रतच धारण केले आहे. परंतु याच काळात तिकडे रोममध्ये बंडाळी माजली. बंडखोरांनी मदतीची याचना करण्यासाठी तिच्याकडे धाव घेतली परंतु तिने सबुरीचा मार्ग पत्करला. घाईगर्दीने कोणताच निर्णय घेण्याची तिची तयारी नव्हती. ज्युलियस सीझरनंतर तिकडे

रोममध्ये कोण सत्ताधीश बनतो तेच तिला पाहायचे होते.

पूर्वेला उदयाला आलेला मार्क अँन्टनी हा रोमचा सत्ताधीश बनला. त्याने क्लिओपात्राला टारसस इथे आपल्या भेटीला बोलावून घेतले. प्रथम तिने त्याच्या ह्या आमंत्रणाकडे दुर्लक्षच केले परंतु नंतर ती त्याच्या भेटीला निघाली. त्यावेळचा तिचा थाटमाट काय पुसावा ? सोने, हिरे माणके, मोती आणि गुलाम यांनी गच्च भरलेल्या गलबतांचा तांडाच्या तांडाच बरोबर घेऊन ती त्याच्या भेटीला निघालेली. अंगावर व्हीनसचा पोषाख चढवून ती सोन्याच्या झुल्यावर बसलेली. झुला अर्थातच तिच्या शाही नौकेवरच बांधलेला अंगावर व्हीनसचा पोषाख चढविल्यामुळे, ती फारच देखणी दिसली. तिच्या गलवतांचा तो तांडा टारसस बंदराला लागला. मात्र क्लिओपात्रा आपल्या नौकेतून खाली उतरून मार्क अँन्टनीला भेटायला पुढे गेली नव्हती. नौकेचा नांगर टाकून ती तशीच आपल्या झुल्यावर बसून राहिली. मार्क अँन्टनी स्वत: तिच्या नौकेवर तिला भेटायला गेला. आपल्या संपत्तीने आणि वैभवाने तिने त्याचे डोळे दिपवून टाकले. तिच्या नौकेच्या वल्हयांना चांदीच्या टोप्या बसविलेल्या. नावाडी वल्ही मधुर संगीताच्या तालासुरावर समुद्राच्या पाण्यावर मारीत होते. नौकेवरच्या गुलाम स्त्रियांना समुद्र सुंदरींचा वेष चढविलेला. त्यांनी त्यांच्या हातात नौकेच्या दोऱ्या धरलेल्या. उत्तमपैकी अत्तराचे दिवे नौकेवर जळत राहिलेले. अत्तराचा सुगंध साऱ्या वातावरणात भरून राहिलेला. गुलाम मुले, सोन्याचे पाणी दिलेल्या चांदीच्या पंख्यांनी झुल्यावर बसलेल्या, व्हीनसचा पोषाख करून बसलेल्या क्लिओपात्राला वारा घालीत राहिलेली. चांदी-सोन्याची भांडी भोजनासाठी वापरलेली. भोजनासाठी असे शाही

पदार्थ बनविलेले की, त्यांची चव मार्क अँन्टनीने आपल्या साऱ्या आयुष्यात कधी चाखली नव्हती. भोजन समारंभ आटोपल्यावर पाहुण्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. सोन्याच्या ताटल्या, पाणी पिण्याची चांदीची भांडी, एम्ब्रॉयडरी केलेल्या शाली– शेले आणि वेगवेगळ्या प्रकारचे कोच.

दुसऱ्या रात्री, क्लिओपात्राने तिच्या शाही नौकेवर, शाही पाव्हण्यांसाठी मनोरंजनाचा एक कार्यक्रम ठेवला. त्यावेळीसुद्धा तिने उपस्थितांना एकेक मौल्यवान भेट दिली. हे सर्व करण्यात मार्क अँन्टनीचे मन जिंकण्याचाच केवळ तिचा हेतू नव्हता. इजिप्त देशाच्या वैभवाची आणि संपन्नतेचीसुद्धा त्याच्या मनावर छाप पाडण्याचासुद्धा तिचा हेतू होता. तो तिचा हेतू सफल झाला !

अवघ्या तीनच महिन्यांनी, मार्क अँन्टनी हा स्वत:हून अलेक्झांड्रियाला पुन्हा परत आला. आणि तो सारा हिवाळा त्याने क्लिओपात्राच्याच संगतीत व्यतीत केला, वसंत ऋतूला प्रारंभ झाल्यावर मग कुठे त्याने अँलेक्झांड्रिया सोडले. त्याच सुमाराला क्लिओपात्राला जुळया मुलांचा लाभ झाला.

पुढली चार वर्षे, मार्क अँन्टनी हा कधी तिला भेटलाच नव्हता. त्याच्या तशा वागण्याचे तिला मोठे नवल वाटले. ह्या अवधीत तिने आपल्या देशाच्या संरक्षणाची फळी अगदी मजबूत केली. आपले नौदल तिने सुसज्ज आणि शक्तिशाली बनवले. आपल्या तिजोरीत तिने सोन्याचा भरपूर साठा करून ठेवला.

मार्क अँन्टनीला आपल्या सत्तेचा विस्तार पूर्वेकडे करायचा होता. तेव्हा क्लिओपात्राला त्याने सीरियात भेटीला बोलावले. त्याला भेटण्यासाठी ती तिकडे गेली. परंतु यावेळी तिने त्याच्याशी सौदा करायचे ठरविले. चौदाशे वर्षांपूर्वी, फरोहाने इजिप्तचा

अफाट मुलूख घेतला होता, आणि तो मुलूख ह्यावेळी रोमच्या आधिपत्याखाली होता. तो मुलूख तिने त्याच्याकडून परत मागून घेतला. याचवेळी मार्क अ‍ॅन्टनीने तिच्याशी कायदेशीर विवाह केला. विवाह करायला तिनेच त्याला भाग पाडले. ह्या आनंदाच्या प्रसंगी एक नवे नाणे पाडण्यात आले. त्या नाण्यावर क्लिओपात्रा आणि मार्क अ‍ॅन्टनी अशा दोघांच्या प्रतिमा होत्या.

क्लिओपात्रा आता तेहतीस वर्षे वयाची प्रमदा झालेली. आपल्या पतीबरोबर आता ती इराण देशावर स्वारी करायला निघाली. युफ्राटिस नदीच्या काठावर त्यांची स्वारी पोचली. आणि तिला आपल्या स्वारीचा बेत सोडावा लागला कारण ह्यावेळी, ती गरोदर राहिली होती. तिची प्रकृती नाजूक बनलेली. तशा अवघड अवस्थेत तिला आपली स्वारी पुढे चालू ठेवणे शक्य झाले नाही. त्या पावसाळ्यातच ती प्रसूत झाली.

हिवाळ्यात असह्य अशी कडक थंडी पडली. मार्क अ‍ॅन्टनीचे बरेच सैन्य त्याला सोडून सीरियन सरहद्दीकडे गेले. ह्यावेळी, क्लिओपात्रा आपल्याबरोबर भरपूर पैसा, पुरेशी रसद आणि शस्त्रास्त्रांचा प्रचंड साठा घेऊन, त्याच्या सहाय्याला धावली.

पुढील वर्षी म्हणजे ख्रिस्तपूर्व ३५ व्या साली, मार्क अ‍ॅन्टनी पक्का दारूडा बनला. मद्यपानापासून त्याला परावृत्त करण्यासाठी, क्लिओपात्राला बऱ्याच खटपटी आणि लटपटी कराव्या लागल्या. दारूच्या अम्मलातच त्याने इराणवर स्वारी करायची योजना आखली. त्या स्वारीपासून त्याला परावृत्त करण्याचा, तिने बराच प्रयत्न केला. म्हणाली, ‘ इराणवर कशासाठी स्वारी करायची ? रोमचा आक्टेव्हियन हाच आपला सच्चा

दुष्मन. तो ज्युलियस सीझरचा पुतण्या. त्याच्याशी प्रथम आपण दोन हात करायला हवेत. त्याचे पारिपत्य करायला हवे. '

पुढल्या वर्षी तिने आक्टेव्हियनबरोबर युद्ध पुकारण्याची तयारी चालवली. मार्क अ‍ॅन्टनीचे मन वळवून तिने त्याला दोन गोष्टी करायला लावल्या. (१) मार्क अ‍ॅन्टनीला त्याच्या पहिल्या पत्नीबरोबर घटस्फोट घ्यायला लावला (२) त्याच्या सैन्याला एजियन समुद्र पार करून, ग्रीस देशात घुसण्याचा हुकूम द्यायला लावले.

ह्यावेळी क्लिओपात्रा सार्वभौम. मध्यपूर्वेकडले देश तिला खंडणी देत. ती महाराणीच बनलेली. त्यांनी तिचा पुतळासुद्धा उभारलेला. अथेन्सचे लोक तिचा मान– सन्मान करीत.

ग्रीसच्या पश्चिम किनाऱ्यावर आक्टोयम येथे मार्क अ‍ॅन्टनी व क्लिओपात्रा यांच्या सैन्याचा दारूण पराभव झाला. साठ लढाऊ जहाजे घेऊन त्या लढाईत क्लिओपात्राला इजिप्तला पळ काढावा लागला. ह्या पलायनाच्यावेळी मार्क अ‍ॅन्टनी तिच्या-बरोबरच होता. ही घटना ख्रिस्तपूर्व ३१ व्या साली घडली. त्यांचा दारूण पराभव का झाला ह्याबद्दल इतिहास गप्पच आहे.

त्यांच्या पराभवाची वार्ता इजिप्त देशात पसरली. लोक असमाधानी बनले, त्यांच्या असमाधानाचा स्फोट व्हायची भीती होती. ते लोक बंड पुकारण्याची शक्यता होती. सुदैवाने मोठ्या मुत्सद्देगिरीने क्लिओपात्राने तसा स्फोट होऊ दिला नाही. कडक उपाय योजून त्यांची बंडाळी तिने मोडून काढली. भूमध्यसमुद्रा-पासून तांबड्या समुद्रापर्यंत पसरलेल्या आपल्या शेजारी राष्ट्रांशी तिने मैत्रीचे संबंध स्थापन केले. आणि त्या बाजूला तिने आपली

लढाऊ जहाजे पाठविली.

रोमच्या आक्टोव्हियनचे सैन्य, इजिप्त देशावर चाल करून आले. सरहद्दीवरचे किल्ले त्याच्या सैन्याने भराभर घ्यायला सुरुवात केली. ह्यावेळी क्लिओपात्रा अलेक्झांड्रियातील राजवाड्यात स्वस्थ बसून विचार करीत राहिली. 'रणांगणात उतरून आक्टेव्हियनशी सामना करावा की, त्याच्याशी आपण तहाची बोलणी करावी ?' परंतु ती तशी विचार करीत बसली असतानाच, शत्रूच्या सैन्याची आगेकूच धूमधडाक्यानेच चालू राहिली. आणि क्लिओपात्रावर दुष्मनाशी समोरासमोर दोन हात करायचीच वेळ आली तेव्हा तिच्या पायदळाने आणि नौदलाने ऐनवेळी दगा दिला. त्या दोन्ही दलांनी आपल्या राणीशी असहकार पुकारला. राणी हतबल ठरली आणि दुष्मन तिच्यावर आणि मार्क अँन्टनीवर चाल करून आला ह्या लढाईच्या गडबड गोंधळामध्ये मार्क अँन्टनीने आपल्या जीवनाचा शेवट करून घेतला. त्याने आत्महत्या केली. जिवंतपणी तो दुष्मनाच्या हाती सापडला नाही, पण मग क्लिओपात्रा एकाकी आणि एकटी पडली, मार्क अँन्टनी हा जिवंतपणी आपल्या हाती लागला नाही म्हणून ऑक्टेव्हियनला चुटपूटच लागून राहिली, सुदैवाने क्लिओपात्रा ही मात्र जिवंतपणी त्याच्या हाती लागली होती. तिला त्याने ठणकावून बजावले, 'जर का तू आपल्या जिवाचे बरेवाईट करायचा प्रयत्न केलास तर तुझी मुले काही आम्ही जिवंत ठेवणार नाही. तुझ्याबरोबर त्यांचाही निकाल लावू ही गोष्ट नीट ध्यानात ठेव '

राणी क्लिओपात्रा आक्टेव्हियनची कैदी बनली. कैदेतून पळून जाण्याची अथवा आत्मनाश करून घ्यायची संधी तिला

मुळीच मिळणार नव्हती, 'राणीला मी सहानुभूतीने वागवीन' असे ऑक्टेव्हियन आश्वासन देत राहिला. परंतु त्याच्यावर ती भरवसा कसा ठेवणार ? कारण तिच्याशी एकनिष्ठ सरदार–दरकदारांना साखळदंडाने बांधून त्याने रोमच्या रस्त्यावरून त्यांची धिंड काढलेली आणि नंतर त्याने त्या सर्वांना फासावर लटकाविलेले. मग क्लिओपात्राला तो कसा सहानुभूतीने वागविणार ? ती पक्की शहाणी होती. तिने असे नाटक वठवायला सुरुवात केली की, 'आत्महत्येचा विचार आपण आपल्या मनातून साफ काढून टाकलाय.' पण हा केवळ तिचा बहाणाच होता.

ऑक्टेव्हियन तिच्या त्या नाटकाला फसला. 'मला मार्क अॅन्टनीच्या थडग्याला भेट द्यायची आहे. त्याच्या थडग्यावर अश्रुफुले वाहावयाची आहेत.' असे सांगून तिने त्याची परवानगी मिळविली. तशी परवानगी मिळताच ती आपल्या निवासस्थाना-कडे गेली. ह्या प्रसंगी तिचे विश्वासू सहकारी तिच्याबरोबर होते. निवासस्थानी आल्यावर स्नानाची मनसोक्त हौस तिने पुरवून घेतली. मग पोटभर भोजन घेतले. हे सारे उरकल्यावर तिने आपल्या दासींना हुकूम फर्मावला.

'बायांनो तुम्ही माझ्या अंगावर व्हीनसचा पोषाख चढवा.'

पण त्यानंतर पुढे तिथे तिच्या निवासस्थानी काय घडले, ते कुणालाच ज्ञात नाही. क्लिओपात्रा काय करते हे पाहण्यासाठी रोमन अधिकारी तिच्या निवासस्थानी गेले, तेव्हा त्यांना तिच्या निवासस्थानाची सर्व दारे आणि खिडक्या घट्ट बंद दिसली. त्यांना भीती वाटली की, काहीतरी सोंगढोंग करून ती आपल्या हातून निसटली तर नसेल ? त्या रोमन अधिकाऱ्यांच्या पोटात भीतीचा

गोळा उभा राहिला. त्यांनी तिच्या निवासस्थानाची दारे खिडक्या फोडायला तोडायला सुरवात केली. दारे खुले होताच, सारे अधिकारी तिच्या महालाकडे धावले. आणि तिथले भयानक दृश्य पहाताच त्यांना धक्का बसला.

क्लिओपात्रा तिच्या महालात होती परंतु ती जिवंत मात्र नव्हती. तिने आत्महत्या केली होती. युरोपीय राजकीय क्षितिजावरचा एक तेजस्वी तारका लुप्त झाली !

एक दंतकथा तिच्याविषयी विशेष प्रसिद्ध आहे ती अशी—

क्लिओपात्राला अंजिरे फारच आवडत. अंजिराच्या टोपल्या तिच्या निवासस्थानी नेहमीच मागविल्या जात. त्या दिवशीसुद्धा तिने तशीच अंजिराची टोपली मागविली. त्या टोपलीत आपल्या नोकराकडून एक विषारी साप ठेवायची तिने व्यवस्था केली. टोपली हातात आल्यावर तिने त्या विषारी सापाकडून स्वतःला दंश करून घेतला. याच दंतकथेवर विश्वास ठेवायची पाळी आपल्यावर आली आहे. तिचा शेवट तसा झाला असावा.

नंतर इजिप्त देश, ऑक्टेव्हियनच्या आधिपत्याखाली आला. मग रोम शहरात त्याने मोठा विजयोत्सव साजरा केला. त्या आनंदाच्या प्रसंगी, क्लिओपात्राच्या पुतळ्याची धिंड काढण्यात आली. तो पुतळा रोमच्या रस्त्यावरून फरफटत फिरवण्यात आला. एक विषारी साप तिच्या हाताला दंश करीत आहे असाच तो पुतळा बनविलेला होता. त्या पुतळ्याची धिंड काढण्यापूर्वी, ज्युलियस सीझरपासून क्लिओपात्राला झालेल्या सीझरीयन ह्या मुलाला फाशी दिले.

मार्क अॅन्टनीपासून क्लिओपात्राला तीन मुले झालेली. त्या

तीनही मुलांचीसुद्धा रोमच्या रस्त्यावरून धिंड क। आणि त्यांची हवी तशी विटंबना करण्यात आली.

ऑक्टेव्हियन नेता बनलेला. कवींनी आणि त्याच्यावर स्तुति– सुमनांचा बर्षाव केला. परंतु तसे त्यांनी क्लिओपात्राची हवी तशी निंदानालस्तीच केली.

गो
प
:

# कादंबरीकार हॅरिएट

अमेरिकेतील कनेक्टिकट राज्यात हॅरिएटचा जन्म झाला. तेथेच ती लहानाची मोठी झाली. सिनसिनाटी इथे तिने अठरा वर्षे वास्तव्य केले. त्या भागात गुलामांवर अन्याय होई, त्यांचा छळ केला जाई. त्यांच्यावर जुलूम जबरदस्ती केली जाई. त्यांना मारहाण केली जाई, ह्या साऱ्या प्रकारामुळे तेथे नेहमी दंगेधोपे होत. हे सारे तिने आपल्या डोळ्यांनी पाहिलेले. धन्याच्या हातून पळून आलेल्या गुलामांना तिनेच सहाय्य केलेले. पळून आलेल्या त्या गुलामांची कर्मकहाणी तिने अगदी लक्षपूर्वक ऐकलेली.

सन १८५० मध्ये, हॅरिएटचे स्टौवे कुटुंब ब्रुन्सविक इथे राहायला आले. कारण-हॅरिएटचे पतिराज कॅलव्हिन यांना मेन इथल्या बाऊडोविन कॉलेजात प्राध्यापकाची जागा मिळाली, गुलामांची दुष्ट रूढी ह्यामेन भागातही रूढ होतीच. वृत्तपत्रांतून गुलामी पद्धतीविषयी रकानेच्या रकाने भरून येत. अमेरिकेच्या सिनेटमध्ये गुलामी पद्धत नष्ट करण्याबाबत कडाडून भाषणे होत. भर बाजारात गुलामांचे लिलाव केले जात. गुलामांचा जनावरा-सारखाच लिलाव केला जाई.

हॅरिएटचा बंधू रेव्हरंड हेन्री हा आपल्या प्रवचनातून

गुलामांच्या दुष्ट रूढीबद्दल टीका करीत असे. सारे वातावरण अगदी तंग आणि तापलेले असायचे.

स्टौवे कुटुंबाला आर्थिक मदत करण्यासाठी, हॅरिएटने काही कथा लिहून मानधन मिळवले होते. भाऊ पाद्री, तेव्हा तिच्या मनावर धार्मिक मताचा पगडा होताच. तिला गुलामी पद्धतीचा तिटकारा आणि तिरस्कार वाटे. त्या पद्धतीमुळे समाजात अनेक अनाचार आणि दुराचार, चालू होते. गुलाम बनलेल्या तरुणींची इज्जत धन्याकडून बेधडक लुटली जाई. गुलाम बनलेल्या पित्याला आपल्या कन्येचे, पतीला आपल्या पत्नीचे, आणि भावाला बहिणीचे संरक्षण करता येत नव्हते. गुलामांच्या मालकांना जणू काय अनिर्बंध सत्ता मिळालेली. ह्या दुष्ट गुलामी पद्धतीचा लोकांना अगदी वीट आलेला, परंतु गुलामी पद्धत नष्ट करणे हा पडला राजकीय प्रश्न. गुलामी पद्धत नष्ट व्हावी असे हॅरिएटला अगदी मनापासून वाटे. तशी तिला अगदी तळमळ लागून राहिलेली. परंतु त्या राजकीय प्रश्नावर तिला आपली लेखणी चालवता कशी येणार ? परंतु गुलामांवर होणाऱ्या अन्यायाबद्दल आपण काहीतरी करायला हवे असे तिला सारखे वाटे. परंतु त्यासाठी आपण काय करावे ते मात्र नेमके तिला सुचत नव्हते.

एक दिवस हॅरिएटच्या हातात तिच्या वहिनीचे पत्र पडले. त्या पत्रामुळे हॅरिएटच्या धुमसणाऱ्या मनात ठिणगी पडली. मिसेस एडवर्ड बीचर ही तिची वहिनी. रेव्हरंड बनलेल्या भावाची ती पत्नी. तिने पत्रात लिहिले–

'हॅरिएट, जर का तुझ्यासारखी मला लेखणी चालवता आली असती तर मी ह्या गुलामांच्या नरकयातना जगापुढे मांडून झोपलेल्या जगाला खडबडून जाग आणली असती, पण

मी काय करणार ? लेखणी असून मला लेखणीचा उपयोग करता येत नाही. नाहीतर झोपलेल्या समाजाला मी डोळे उघडायला लावले असते. परंतु लेखणी चालविण्याचे डोके मला देवाने दिलेले नाही.'

ह्या पत्रातला मजकूर हॅरिएटने पुन्हा पुन्हा वाचला आणि ती बेचैन बनली. ते पत्र तिने आपल्या मुलांनासुद्धा वाचून दाखवले. परंतु तरी सुद्धा तिच्या मनाला समाधान लाभले नाही. काय करावे ते तिला सुचेना आणि इतक्यात तिच्या डोक्यात एक कल्पना विजेसारखी चमकली. ताडकन् उठून ती उभी राहिली. स्वतःशीच उद्गारली, 'आता पुढे मी हात जोडून आणि डोळे मिटून स्वस्थ बसणार नाही. गुलामांच्या ह्या दुर्दशेबद्दल, मी अवघ्या राष्ट्राला माझ्या लिखाणाने खडबडून जागे केल्यावाचून रहाणार नाही. ह्यापुढे मी आपली लेखणी याच एका विषयाला वाहून घेणार.'

टेबलाजवळच्या खुर्चीवर ती बसली. कागद पुढे ओढले आणि लेखणी शाईत बुडवून तिने भराभर लिहायला सुरुवात केली.

'फेब्रुवारी महिन्यातील एका थंड संध्याकाळी दोन सद्-गृहस्थ डायनिंग टेबलावर बसून शांतपणे मद्यपान करू लागले. केनटकीमधली ही गोष्ट–' आपण पुढे लिहीत राह्यचे एवढेच तिला ठाऊक.

## 'अंकल टॉम्स केबिन'

ह्या जगप्रसिद्ध कादंबरीचा जन्म हा असा झाला. कादंबरीचे लेखन चालू असताना, हॅरिएट पुन्हा पुन्हा स्वतःशी म्हणायची,

'छे छे ! ही कादंबरी काही मी लिहीत नाही. स्वत: परमेश्वरच ही कादंबरी माझ्याकडून लिहून घेत आहे. अहो. मी तर पामर. माझ्या हातून अशी दिव्य कादंबरी कशी काय लिहून होणार ?'

आपल्या ह्या कादंबरीचे कथानक पुढे कसे काय उलगडत जाणार याची मा तिला मुळीसुद्धा कल्पना नव्हती. तरीसुद्धा तिने आपले लेखन चालूच ठेवले. जसे सुचेल तसे ती लिहीत गेली. आपले अनुभवच ती चित्रित करीत गेली.

एक मालक, चाबकाचे फटके सटासट मारून अंकल टॉमच्या अंगाची चामडी लोळवतो हा प्रसंग एक धार्मिक प्रवचन ऐकताना तिच्या डोळ्यांपुढे स्पष्ट उभा राहिला, तो करुण प्रसंग तसाच तिने आपल्या कादंबरीत रेखाटला.

एका वृद्ध गुलामाला त्याचा गोरा धनी अगदी बुकलून काढतो. हा प्रसंग तिने तसाच चिति केला. प्रवचन संपल्यावर ती अश्रू ढाळीतच आपल्या घरी आली. त्या दृश्याने ती अगदी झपाटल्यासारखी झाली. तशा झपाटलेल्या अवस्थेतच तिने तो प्रसंग लिहून काढला. लिहून झाल्यावर तिने आपले लिखाण मुलांना वाचून दाखवले. आणि मुले ढसाढसा रडली. प्राध्यापक पती तो प्रसंग वाचून तिला म्हणाले, 'वा ? हॅरी फारच सुंदर ! हाच प्रसंग मध्यबिंदू मानून तू ही कादंबरी लिहायला हवी. तशी परम दयाळू परमेश्वराचीच इच्छा आहे.'

हॅरिएटला हुरूप आला. कादंबरीचे पुढील कथानक, तिच्या पुढे आपोआप उलगडत गेले. जणू काय परमेश्वरच तिला प्रेरणा देत राहिला. कादंबरी मनासारखी व्हावी म्हणून हस्तलिखित

तिने तीन चार वेळा लिहून कांढले. हस्तलिखित मनासारखे लिहून काढल्यावर तिने वृत्तपत्रांना ते दाखवायला सुरुवात केली.

वॉशिंग्टनमधील 'नॅशनल इरा' ह्या छोटया साप्ताहिकाचा संपादक 'ब्रेली.' हॅरिएटने आपली कादंबरी ह्या संपादक ब्रेलीला दाखवली. कादंबरी त्याला आवडली. ती कादंबरी आपल्या साप्ताहिकासाठी त्याने स्वीकारली. कादंबरीचे मानधन तीनशे डॉलर्स, त्याने तिच्या हातावर ठेवले. हॅरिएटला आनंद झाला. कादंबरी स्वीकारलेली आणि वर मानधन मिळालेले.

### 'अंकल टॉम्स केबिन'

ही कादंबरी 'नॅशनल इरा' साप्ताहिकातून हप्त्या-हप्त्याने प्रकाशित होऊ लागली. त्या कादंबरीचा पहिला हप्ता दि. ५ जून १८५१ ह्या दिवशी प्रसिद्ध झाला. आणि त्या साप्ताहिकावर वाचकांच्या प्रचंड उडया पडल्या. अमेरिकन तरुणांची एक पिढीच्या पिढीच तिच्या त्या कादंबरीने खडबडून जागी केली. आणि ती पिढी गुलामांची पद्धत नष्ट करायला दंड थोपटून उभी राहिली.

आपल्या जीवनातील प्रत्यक्ष अनुभवांवरच हॅरिएटने ती कादंबरी लिहिलेली. एकदा ती दक्षिण अमेरिकेत रहाणाऱ्या आपल्या मैत्रिणीकडे गेली. गुलामी पद्धतीबाबतच्या काही घटना तिला तेथे प्रत्यक्ष पाहचला मिळाल्या. तिने ठरवले की, आपल्या कादंबरीतला 'अंकल टॉम' हा केनटकीच्याच मळयात राबणारा गुलाम दाखवायचा, पण केनटकीमधले काही मालक दयाळू होते. तेव्हा तिने ठरवले की, आपल्या कादंबरीतला केनटकीमधला

दयाळू मालक, 'अंकल टॉम' ह्या गुलामाला दुसऱ्या कुणाला तरी विकतो असेच आपल्या कादंबरीत दाखवायचे.

बोस्टन शहरामध्ये तिची एका निग्रो पुरोहिताशी भेट झाली. तो एक सामाजिक कार्यकर्ता. त्याने आपले स्वातंत्र्य मालकाला काही डॉलर्स देऊन विकत घेतलेले. तिने बेत केला की, आपल्या कादंबरीतला 'अंकल टॉम' ह्या गुलामाचे व्यक्तिचित्रण, त्या निग्रो पुरोहिताला आपल्या नजरेसमोर ठेवून करायचे.

हॅरिएटचा भाऊ चार्लस याला न्यू ऑर्लिन्सच्या एका बोटीवर, गुलामांच्या कामावर देखरेख करणारा एक मुकादम भेटला. त्या मुकादमाने चार्लसजवळ फुशारकी मारली, 'माझ्या हाताखालच्या गुलामांकडून मी अगदी मरेमरेस्तोवर काम करून घेतो. त्यांना हाडाची काडे आणि रक्ताचे पाणी करायला लावतो.'

'अंकल टॉम्स केबिन' कादंबरीतले 'सायमन लेग्री' हे पात्र त्या दुष्ट मुकादमावरूनच तिने रेखाटले.

सिनसिनाटीमधल्या संडे स्कूलमध्ये तिला एक अतिशय खोडकर मुलगी भेटली. हॅरिएटने तिला आपल्या कादंबरीत 'टॉप्सी' हे नाव दिले.

उत्तर अमेरिकेतील लोकांपेक्षा, दक्षिण अमेरिकन लोक, निग्रो गुलामांना अधिक चांगली वागणूक देतात असे नेहमीच म्हटले जाई. १८५१।५२ साली, हॅरिएटने तीच गोष्ट आपल्या कादंबरीत प्रतिपादन केली. गुलामाच्या पद्धतीबाबत सर्व बाजूंनी नीट विचार करून तिने ती कादंबरी लिहिली. म्हणूनच ती कादंबरी परिणामकारक ठरली. 'सायमन लेग्री' ह्या पात्राला तिने अगदी काळाकुट्ट खलनायक बनविला. अमेरिकन वाङ्मयाला

खराखुरा खलनायक म्हणून तो अगदी सुपरिचित झाला.

'अंकल टॉम्स केबिन' ह्या कादंबरीने अवघ्या अमेरिकन राष्ट्रात प्रचंड खळबळ माजवली. 'नॅशनल इरा' ह्या साप्ताहिकाच्या कचेरीत वाचकांच्या पत्रांचा अक्षरशः नुसता पाऊस पडला. कादंबरीतील प्रत्येक पात्राची आणि प्रत्येक प्रसंगाची वाचकांनी अगदी तोंड भरून स्तुती केली.

'नॅशनल इरा' साप्ताहिकात एका आठवड्याला हॅरिएट त्या कादंबरीचे प्रकरण वेळेवर पाठवू शकली नव्हती. त्या आठवड्याला त्या साप्ताहिकात तिच्या प्रकरणाला प्रसिद्धी मिळाली नाही. आठवडा सुना गेला म्हणून असंख्य वाचकांनी मोठा गहजब केला. मोठा गोंधळ माजवला. तिच्या कादंबरीने वाचकांना वेडे बनविले होते.

कादंबरीचा शेवट मात्र, तिच्या लेखणीपासून दूरदूर पळत राहिला. आणि ती पानामागून पाने लिहीत राहिली. कुठेही घराबाहेर गेली, तरी कादंबरीचे पुढील प्रकरण तिला भेडसावीत राही. आणि मग घरगुती काम तिला अगदी सुचेनासे होई. एखाद्या वेड्यासारखीच तिची अवस्था झालेली.

कादंबरीचा पसारा बराच वाढला. बोस्टन शहरातला एक छोटा प्रकाशक जॉन पी. ज्युएट हा ती कादंबरी पुस्तक रूपाने प्रकाशित करायला तयार झाला. त्याची कल्पना अशी की कादंबरीचे पुस्तक लहानसेच होईल. थोड्याच पैशात ती, आपल्या वाचकांना देता येईल. परंतु त्याची ती कल्पना साफ कोसळली.

आक्टोबर महिन्यात त्याला कळून चुकले की, 'ही कादंबरी आपल्याला दोन खंडांत काढावी लागणार. आणि दोन खंड काढण्यासाठी आपल्याला बरेच डॉलर्स खर्च करावे लागणार;'

त्याच्या छातीत धडकीच भरली. कारण हॅरिएटच्या कादंबरीचा शेवटच लौकर होईना. ज्युएट ह्या प्रकाशकाने मग तिला सल्ला दिला. ' आपली कादंबरी जर का तुला लोकप्रिय करायची असेल तर ताबडतोब तू आपली कादंबरी आवरती घ्यायला हवी कारण एका अप्रिय विषयावर तू लेखणी चालवते आहेस. ' त्याचा हा सल्ला हॅरिएटला पटला. मग ' नॅशनल इरा ' साप्ताहिकाने वाचकांना सूचना दिली की, ' आम्ही दर आठवड्याला क्रमशः प्रसिद्ध करीत असलेली ' अंकल टॉम्स केबिन ' ही कादंबरी ही आता थोडक्याच परिच्छेदांत पुरी करणार आहोत. लेखिकेने कादंबरी लिहून पुरी केली आहे.' हे वाचल्यावर, असंख्य वाचकांनी अगदी कडाडून आणि प्रचंड विरोध दर्शविला. वाचक म्हणाले ' छ्या छ्या ! त्या कादंबरीचा शेवट असा झटपट करताच येणार नाही. कादंबरी अशीच पुढे चालू राहयला हवी. '

मग काय ? हॅरिएट बिचारी लिहीतच राहिली. नाताळचा सण चालू असताना त्या साप्ताहिकात कादंबरीचा एक हप्ता प्रसिद्ध झाला. त्या प्रकरणात ' इव्हा ' ह्या पात्राचा मृत्यू घडून आल्याचे तिने दर्शविले होते. ही घटना लिहून झाल्यावर स्वतः हॅरिएटलाच फार वाईट वाटले. पुढले अठ्ठेचाळीस तास तिने संपूर्ण विश्रांतीच घेतली. ' इव्हाच्या ' मृत्यूबाबत ती वैयक्तिक शोक करीत राहिली. एका साधुवृत्तीच्या मुलीचा तसा शेवट केल्याबद्दल तिला दोष देणारी वाचकांची असंख्य पत्रे आली. पण आता इलाज उरला नव्हता. खुद्द ' अंकल टॉम ' याचाच मृत्यू कादंबरीत दाखविण्याची आता वेळ येऊन ठेपली होती. कादंबरीच्या प्रकरणात लोंबत राहिलेले धागे आता नीट जुळवून घ्यायला हवे होते. कथानकाचा शेवट जवळ आला होता.

ज्युएट प्रकाशक अस्वस्थ बनलेला. कादंबरी प्रकाशनाच्या खर्चाचे प्रमाण बरेचसे वाढलेले. त्याच्या आटोक्याबाहेर गेलेले. त्याने हॅरिएटला सुचविले, ' कादंबरी प्रकाशनाचा अर्धा खर्च तिने करावा. प्रती विकून जो नफा होईल. त्याचा अर्धा वाटा तिने उचलावा. '

पण हॅरिएटचे पती कॅलव्हीन यांच्यापाशी तेवढे डॉलर्स नव्हते. कादंबरीवर प्रकाशकाकडून अवघी दहा टक्के रॉयल्टी घ्यायचे त्यांनी कबूल केले. ह्या उलट प्रकाशनाचा अर्धा खर्च देऊन अर्धा नफा घेतला असता तर? कॅलव्हीन गर्भश्रीमंत बनायला फारसा वेळ लागला नसता. कारण अमेरिकेत त्या कादंबरीचा प्रचंड खप झाला. प्रकाशकाला अगदी भरपूर नफा झाला. परंतु रॉयल्टीची रक्कम हातात पडल्यावर हॅरिएट संतुष्ट झाली. पैसे मिळाल्यावर ती उद्‌गारली, ' आता ह्या पैशावर मला सिल्कचा ड्रेससुद्धा खरेदी करता येईल. '

ही कादंबरी निदान काही काळ तरी अज्ञातवासातच राहिली. कारण ग्रंथ समीक्षकांनी प्रथम तिच्याकडे दुर्लक्षच केले. दि. २० मार्च १८५२ रोजी ही कादंबरी बाजारात विक्रीसाठी आली, त्या दिवशी कादंबरी खरेदी करण्यासाठी वाचकांनी प्रकाशकाच्या कचेरीत खूपच गर्दी केली. ' अंकल टॉम्स केबिन 'ची पहिली ६००० प्रतींची आवृत्ती ताबडतोब संपली. अमेरिकन साहित्याच्या इतिहासातील हा विक्रमच ठरला !

कादंबरीची छपाई जलदीने व्हावी म्हणून ज्युएट ह्या प्रकाशकाने पॉवरवर चालणारी छपाई यंत्रे खरेदी केली. ती यंत्रे आपल्या छापखान्यात बसविल्यावर त्याने त्या यंत्रांकडून चोवीस तास काम करून घेतले. छपाई कामाला कागदाचा पुरवठा सुर-

ळीत व्हावा, म्हणून कागदाच्या तीन कागद गिरण्या सतत चालू राहिल्या. पहिल्या चार महिन्यांत ह्या कादंबरीच्या जेवढ्या प्रती विकल्या गेल्या, त्याच्या रॉयल्टीचा जो चेक प्रकाशकाकडून हॅरिएटच्या हाती आला, तो चेक १०,३०० डॉलर्स एवढ्या मोठ्या रकमेचा होता. तेवढे डॉलर्स म्हणजे किती रुपये होतात याचा हिशोब करायलासुद्धा आपल्याला बराच वेळ लागेल.

कादंबरी प्रकाशनाच्या पहिल्या वाढदिवशी, प्रकाशकाने जाहीर केले की, ' गेल्या एक वर्षात, ह्या कादंबरीच्या ३०५,०००-तीन लक्ष पाच हजार प्रती विकल्या गेल्या. तरीसुद्धा सर्व वाचकांची मागणी आम्ही पुरी करू शकलो नाही. '

' अंकल टॉम्स केबिन ' ही कादंबरी चोरटेपणाने एक डझन इतर देशांत नेण्यात आली. एक डझन परदेशी भाषांत त्या कादंबरीचा अनुवाद करण्यात आला. युरोप खंडातील रंजल्या-गांजल्या आणि दलित-पीडीत लोकांना ह्या कादंबरीतून त्यांचीच कहाणी वाचायला मिळाली. त्या सर्वांनी ती कादंबरी आपल्या डोक्यावरच घेतली.

लंडन, न्यूयॉर्क, बोस्टन ह्या शहरांत त्या कादंबरीला नाट्यरूप देण्यात आले. नाटकाचा प्रयोग पहाण्यासाठी लोकांनी लांबलचक रांगा लावल्या. अमेरिकन लोक तर ' अंकल टॉमची ' आणि ' इव्हाची ' गाणीच गात बसले.

ऱ्होड आयलंडमधल्या एका कल्पक निर्मात्याने पत्त्यांचा एक नवा खेळ बाजारात टाकला. त्या खेळाचे नाव ' अंकल टॉम आणि लिटल इव्हा ! ' पत्त्यांच्या ह्या नव्या खेळाचीसुद्धा अफाट विक्री झाली.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे ह्या कादंबरीवर जो पहिला

हल्ला झाला तो उत्तर अमेरिकेतून. कारण उत्तरेतील भांडवल-दारांनी आपला बराचसा पैसा दक्षिणेतील कपाशीच्या धंद्यात गुंतवलेला होता. आणि कापूस शेतात पिकविण्यासाठी गुलामांनाच वेठीला धरले जाई. न्यूयॉर्कचे ' जर्नल ऑफ कॉमर्स ' हे त्या भांडवलदारांचे मुखपत्र. त्या पत्रानेच ह्या कादंबरीवर पहिली जोरदार तोफ डागली. अमेरिकेतील सर्वच वृत्तपत्रांनी आणि संपादकांनी, त्या आव्हानाचा स्वीकार केला. वृत्तपत्रातून एका जंगी वादविवादाला तोंड फुटले. काही जण हॅरिएटची बाजू घेऊन, तिच्या बाजूने भांडायला उभे राहिले. तर काहींनी तिच्यावर अगदी कडाडून हल्ला चढविला. परंतु हा केवळ वाद-विवादाचाच विषय राहिलेला नव्हता. दक्षिण अमेरिकेत तर ही क्रांतिकारक कादंबरी जप्त करण्यात आली. बंदी घातल्यामुळे ही कादंबरी घरात ठेवण्याची लोकांना भीती वाटू लागली. दक्षिण अमेरिकेतील माता, ' हॅरिएट ' ही एक जखीण आहे म्हणून आपल्या मुलांना भीती दाखवू लागल्या. हॅरिएटला धमकीची असंख्य पत्रे पाठविण्यात आली.

अमेरिकन लोकांना असे वाटू लागले की, ' अंकल टॉम्स केबिन ' ही केवळ एक कादंबरी नसून अमेरिकन राष्ट्राच्या पायात पेरलेला एक स्फोटक सुरुंग आहे. त्या सुरुंगाची वात आता धुमसते आहे. सुरुंगाचा स्फोट कधी होईल त्याचा नेम नाही. ” अशी ही असामान्य कादंबरी !

❋

# महाराणी व्हिक्टोरिया

महाराणी इंग्लिश मध्यमवर्गाचा हिरीरीने कैवार घेई म्हणून तिला इंग्लिश मध्यमवर्गाचा प्रतिनिधी मानण्यात आले. मध्यम वर्गाविषयी तिला कळवळा आणि सहानुभूती होती. म्हणूनच इंग्लिश उच्चभ्रूवर्गाने तिची हेटाळणी केली. म्हणूनच तिच्या चरित्रावर प्रकाश पाडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न.

व्हिक्टोरिया इंग्लंडची महाराणी आणि एका काळची भारताची सम्राज्ञी. परंतु तिची रहाणी अगदी साधी आणि कष्टाळू. ह्या आजीबाईला माणसाच्या आजाराची फार काळजी वाटे आणि मृताचा श्राद्धदिन ती कधीच विसरत नसे. युरोपभर पसरलेले तिचे साम्राज्य म्हणजे जणू काय तिची कौटुंबिक मालमत्ताच. जर्मनी, ग्रीस, रूमानिया, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क आणि बेल्जियम–युरोप खंडातील इतक्या देशांशी तिचे नात्याचे संबंध होते. परकीय देशांशी असलेले इंग्लंडचे राजकीय संबंध अथवा युरोपियन देशातील राजघराण्यांशी असलेला तिचा नात्याचा वैयक्तिक संबंध काय ? ह्या दोहींत फारसा फरक मानायला ती मुळीच तयार नव्हती. राजकीय संबंध आणि वैयक्तिक संबंध दोन्ही तिला सारखेच.

सन १८९९ मध्ये तिनें आपल्या वयाच्या ८० व्या वर्षात प्रवेश केला. तिच्या काळची सामाजिक घडण ही तिच्या मनाशी आणि आयुष्याशी निगडीत होती. सयामच्या प्रश्नाबाबत इंग्लंड व फ्रान्स देशात वितुष्ट आले. दोन्ही देश एकमेकांसमोर युद्धाला उभे ठाकण्याच्या अगदी जय्यत तयारीत होते. ह्यावेळी व्हिक्टोरिया ही नाईस शहरी होती. तेथून तिने आपल्या पंतप्रधानाला कळवले–

" सध्या मी फ्रान्स देशातील नाईस शहरात आहे. मला आशा आहे की, आपल्या दोन देशांत निर्माण झालेली ही तेढ आणि हमरीतुमरीची भाषा तुम्हाला टाळता येण्याची शक्यता आहे. नाहीतर भलतीच गुंतागुंत निर्माण होईल. "

आपल्या प्रजेबाबत तिला आस्था आणि सहानुभूती आहे. प्रजेच्या मनात काय आहे याची तिला जाणीव असे. प्रजेवर अन्याय होतोय असे लक्षात आल्यावर ती एकदा चॅन्सलर ऑफ एक्स्चेकरवर खूपच रागावली. मध्यम वर्गावर कराचा अधिक बोजा टाकला– डोईजड बोजा टाकला म्हणून तिचे डोके बिथरले. लोकांचा तसा छळ केल्याबद्दल आपल्या मंत्र्याला तिने धारेवर धरले. आपण मध्यम वर्गाबरोबरच जगलो आणि वाढलो अशीच तिची समजूत. तिच्याच कारकिर्दीत, औद्योगिक इंग्लंड देशाने जगाची बाजारपेठ पादाक्रांत केल्याचे अविस्मरणीय चित्र, तिच्या प्रजेला पाहायला मिळाले. मात्र कारखान्यातले कामगार अथवा शेतात राबणारे शेतकरी यांच्याबद्दल तिच्या मनात फारसा ओलावा नव्हता. परंतु बालमोरल इथल्या वृद्ध स्त्रियांना तिने गरम कपडे वाटले होते कारण त्यांच्यावर थंडीत कुडकुडण्याची वेळ आली होती. त्या वृद्ध स्त्रियांनी आपल्या महाराणीला मना-

पासून दुवा दिला. तो प्रसंग कुणालाही गहिवरून टाकणारा असाच होता.

झोपडीत रहाणाऱ्या लोकांची करुणाजनक स्थिती राणीला ज्ञात नव्हती. परंतु दरिद्री लोकांबद्दल तिला सहानुभूतीच वाटे. श्रमजीवी लोकांचे प्रतिनिधी मताधिक्यावर हाऊस ऑफ कॉमन्स-मध्ये निवडून आल्यावर तिला मोठे आश्चर्य वाटले. कष्टकरी लोक त्या आमसभेत आपला प्रतिनिधी निवडून देऊ शकतात याचा तिला अचंबाच वाटला. तिने त्यांच्या प्रतिनिधींना आपल्या राजवाड्यावर बोलावून घेतले. महाराणीने आपल्याला भेटीला बोलावले म्हणून त्या प्रतिनिधींना मोठा आनंद झाला.

मध्यमवर्गीयांच्या आवडीनिवडी आणि तिच्या आवडी-निवडी जुळणाऱ्या आणि सारख्याच होत्या. मध्यमवर्गाचे जे सद्गुण तेच तिचे सद्गुण. सरदार दरकदार, दरबारी आणि मानकरी यांचा निर्देश महाराणी ' वरचा वर्ग ' म्हणून कुचेष्टेने करी. त्या वरच्या वर्गाबद्दल तिचे मत फारसे अनुकूल नव्हते. त्या वर्गाची ती हेटाळणीच करीत असे. त्या वरच्या वर्गालासुद्धा आपल्या महाराणीबद्दल फारशी आस्था आणि आपुलकी वाटत नसे. म्हणूनच त्या वर्गानें तिच्या कारकिर्दीला ' व्हिक्टोरियन एज ' असे कुचेष्टेचे नाव दिले.

आपल्या सरदार वर्गाची तुलना ती क्रांतिपूर्वकाळातील फ्रान्स देशाशी करीत असे. फ्रान्स देशातील लोकांशी करायची. म्हणत असे– " आपल्या छानछोकी वृत्तीमुळे आणि मौजमजा करण्याच्या प्रवृत्तीमुळे, हे आमचे सरदार लोक स्वतःचा सर्वनाश ओढवून घेणार आहेत. "

१९०० साली लंडन शहरात आलेल्या एका अमेरिकन

तरुणीने लंडनमधल्या समान परिस्थितीबद्दल आपल्या घरी लिहून कळविले–

" राणी व्हिक्टोरिया ही सोसायटीत रहात नाही. म्हणूनच तिचा अंतर्भाव सोशल सर्कलमध्ये कधी केला जात नाही. याचाच अर्थ असा की, त्या काळच्या फॅशनेबल विशाल महिला मंडळात महाराणी व्हिक्टोरिया ही कधी मिळत–मिसळत नसे. विशाल महिला मंडळाने आयोजित केलेल्या समारंभाला अथवा पार्टीला ती कधी उपस्थित रहात नसे. आणि त्या काळच्या समाजाला विंडसर राजवाड्यात वास्तव्य करणाऱ्या, राजघराण्यातील ह्या विधवेचे निवृत्त आयुष्य बिलकूल नामंजूर होते. त्या काळच्या मौजमजा करणाऱ्या इंग्लिश समाजाला महाराणीची ही वैराग्य-वृत्ती कशी काय पसंत पडणार ? ऐषआरामी आणि चैनी समा-जात ही वैराग्यशील महाराणी अप्रिय ठरली. त्या काळी ' वॅगनेर संगीत ' हे अतोनात लोकप्रिय. परंतु ते ऐकायलासुद्धा तिने साफ नकारच दिला. कारण संगीतामध्ये तिला गोडी नव्हती. ललित कलांबद्दल तिच्या मनात अढीच असावी. त्या काळच्या मध्यम वर्गालासुद्धा ' वॅगनेर ' संगीत आवडले नव्हते. मौजमजा आणि चैनबाजी हीसुद्धा त्या मध्यमवर्गाला परवडण्यासारखी नव्हती. राणीच्या दरबारात फॅशनेबल लोकांना फारसे महत्त्व नव्हते. प्राधान्य तर बिलकूलच नव्हते.

महाराणीला कुणीतरी सांगितले की, ' वॅगनेर ' संगीत हे भविष्य काळचे संगीत आहे. भविष्य काळात ते संगीत अत्यंत लोकप्रिय ठरणार आहे. " त्यावर ती म्हणाली " त्या संगीताचा आणि तसल्या भविष्याचा मला वैताग वाटतो. तसले संगीत ऐकायची माझी बिलकूल तयारी नाही. " आपल्या बोलण्याचा

आणि वागण्याचा लोकांवर काय परिणाम होतो याची तिने कधीच पर्वा बाळगली नाही.

कधीमधी चर्चमधल्या लांबलचक सर्व्हिसला उपस्थित राही. पाद्रीबुवांनी सर्व्हिसच्यावेळी चालविलेली चर्पटपंजरी, तिला बिलकूल आवडत नसे. पाद्रीबुवांचे चऱ्हाट संपता संपत नसे. आलेले लोक अगदी कंटाळून जात. अशावेळी पंख्याने खूण करून महाराणी पाद्रीबुवांना सांगे, " आता आवरते घ्या. "

नव्याने आलेल्या देशाच्या एका राजदूताने, महाराणीची भेट घेतली. त्यावेळी महाराणीबद्दल त्याचे काय मत झाले ते कुणी-तरी महाराणीच्या कानावर घातले. तेव्हा ती म्हणाली– " डीअर मी "आणि उसासा टाकून पुढे ती म्हणाली, " माझ्याबद्दल त्याचे काय मत झाले हे महत्त्वाचे नसून त्याच्याबद्दल माझे काय मत झाले याच गोष्टीला अधिक महत्त्व आहे. माझ्याबद्दल त्याला काय वाटेल हा विचारच माझ्या मनात कधी आला नव्हता. " महाराणीच्या उद्‌गारांतच तिच्या साध्या रहाणीचे मर्म साठवलेले आहे. लोकांवर आपला प्रभाव पडायला हवा म्हणून तिने आपल्या साध्या रहाणीत कधीच कृत्रिमता आणली नव्हती.

महाराणी काहीशी बुटकी असली तरीसुद्धा ती सुदृढ आणि बांधेसूद होती. तिच्या रहाणीत आणि वागणुकीत एक प्रकारची ' डिग्निटी ' होती. एक प्रकारचा प्रतिष्ठितपणा होता. तिचे डोळे निळेभोर आणि काहीसे पुढे आलेले होते. डोळयांत तारुण्याचे पाणी तरळत असे. तिचे हावभाव चार्मिंग होते. वृद्धावस्थेमुळे त्यात कोणतीच कमतरता आलेली नव्हती. आवाज मधुर आणि हसणे मनमोकळे होते. वेडयावाकडया कोटया करून, कुणाला हसविण्याचा तिने कधीच प्रयत्न केला नव्हता. तिची बुद्धिमत्ता

तीव्र आणि प्रखर होती.

लॉर्ड सॅलिसबरी एकदा उघडपणे म्हणाले, " ब्रिटिश मध्यय वर्गाचे जे विचार आहेत तेच विचार आमच्या राणी सरकारांच्या मनात असावे. कारण मध्यमवर्गाचे विचार आणि राणी सरकारांचे विचार अगदी एकाच पातळीवर असतात.

नियमितपणावर महाराणीचा फार मोठा कटाक्ष. त्यांनी आपले जीवन शिस्तबद्ध आणि नियमबद्ध करून टाकले होते. आपल्या दैनंदिन कार्यक्रमात महाराणीने कधीच खंड पडू दिला नव्हता. सकाळचे नऊ वाजले की, ती आपल्या उघड्या घोडा-गाडीतून फिरायला जाई. ही घोडागाडी ती स्वतःच हाकीत असे. एका हातात चाबूक तर दुसऱ्या हातात घोड्याचा लगाम. मात्र ह्यावेळी तिच्याबरोबर ' लेडी इन वेटींग ' ही असायचीच. घोडागाडी चालू असताना, राजवाड्यातल्या साऱ्या घटना आणि घडामोडी ती महाराणीच्या कानावर घालीत असे. आपल्या राज्यातल्या इतर राजकीय घडामोडींपेक्षा राजवाड्यात घड-णाऱ्या घटनांमध्ये महाराणीला अधिक रस असे. आदल्या दिवशी जर का ती ' लेडी इन वेटींग ' पोर्टस माऊथला गेलेली असली तर ती आज वेळेवर का परत आली नाही ? समुद्र शांत होता की बराच खवळलेला ?' महाराणी असले प्रश्न त्या तरुणीला मोठ्या औत्सुक्याने विचारी. एखाद्या अपंगाची चौकशी करण्या-साठी, महाराणी आपली घोडागाडी, एखाद्या झोपडीच्या दाराशी थांबवी आणि आतल्या अपंगाची चौकशी करी. माकडाचे खेळ करून दाखवणारा माकडवाला पोर, जर का रस्त्यात दिसला तर ती आपली घोडागाडी मुद्दाम थांबवी, त्या पोऱ्याजवळ त्याच्या माकडाच्या तब्येतीची चौकशी करी. साऱ्याच बारीकसारीक

आणि लहानसहान गोष्टींत महाराणी लक्ष घाली आणि स्वतःला कोणत्यातरी कामात गुंतवून ठेवी.

दररोज असंख्य कागदपत्रे, तिच्या सहीसाठी तिच्यापुढे ठेवली जात. साऱ्या महत्त्वाच्या कागदपत्रावर तिला स्वतःलाच सही करावी लागे. स्वतःला कामात गुंतवून ठेवण्यासाठी ती कुणाला ना कुणाला तरी पत्र पाठवी. कुणाला टेलिग्राम पाठवी, कुणाला आपल्या भाषणाची ग्रामोफोन रेकॉर्ड पाठवी. सदान्कदा ती कोणत्या ना कोणत्या कामात दंग असे.

महत्त्वाच्या कागदावर सही करीत असताना, संबंधित सचिवाची उपस्थिती तिला आवश्यक वाटे. संशय आला तर संशयाचे निराकरण करून घेऊन मग ती पुढच्यातल्या कागदावर सही करी. सर आर्थर बिग्ज हे महाराणीचे खाजगी सचिव, त्यांना जर का विंडसर राजवाडा सोडून कुठे बाहेर जायचे असले तर त्यासाठी त्यांना महाराणीची परवानगी घ्यावी लागे. आपले काम आटोपून लंडनहून त्यांना वेळच्यावेळी राजवाड्यात हजर व्हावे लागे. नाहीपेक्षा जर का परतायला उशीर झाला तर ती त्यांनासुद्धा जाब विचारल्यावाचून रहात नसे.

महाराणी व्हिक्टोरियाचा जन्म सन १८१९ मध्ये झाला. वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी तिने इंग्लंडच्या राज्ञीपदाची राजवस्त्रे आपल्या अंगावर चढवली. आणि राजसिंहासनावर विराजमान झाली. साऱ्या युरोपियन राजांच्या कारकिर्दीचा जर विचार केला तर महाराणी व्हिक्टोरियाची कारकीर्द सर्वांत मोठी, अगदी लांबलचक. १८९७ साली तिने आपल्या राज्यारोहणाचा हीरक महोत्सव, साऱ्या साम्राज्यभर साजरा केला. १८३७ साली तिचे राज्यारोहण झालेले. (थोडे विषयांतर होईल परंतु इथे

आपल्याला पुण्याच्या हुतात्मा दामोदर हरि चाफेकर यांची आठवण झाल्याशिवाय रहाणार नाही.) महाराणी व्हिक्टोरिया हिच्याच कारकीर्दीत– फ्रान्स देशात, दोन राजघराण्यांची कारकीर्द झाली. आणि तेथे प्रजासत्ताकाची स्थापना पण झाली. स्पेनमध्ये तेवढ्या अवधीत तीन राजे होऊन गेले. आणि इटली देशामध्ये चार राजे होऊन गेले.

१८९७ साली महाराणीच्या राज्यारोहणाला साठ वर्षे पुरी झाली. ह्यावेळचा तिचा हीरक महोत्सव म्हणजे इतर राष्ट्रांना ह्या महाराणीचा हेवा वाटला. कारण ह्यावेळी अवघ्या जगावर तिचीच अधिसत्ता होती. ब्रिटिश सैनिकांना आणि इतर देशांतील सैनिकांना ह्या समारंभासाठी बोलावून घेण्यात आले. आणि ह्या सर्व सैनिकांसमवेत महाराणीची एक भव्य मिरवणूक काढण्यात आली. ती भव्य मिरवणूक म्हणजे विजयाची एक रोमन यात्राच होय. महाराणी आनंदली आणि तिच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले–

" ह्या समारंभाला माझ्या प्रजेने जो उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, त्याला अवघ्या दुनियेच्या इतिहासात तोड नाही.

१८९७ मधील जून महिन्यातल्या त्या दिवशी राजसत्तेनें अगदी कळस गाठला. हिरे– माणकांची बरसात झाली. आनंदाचा जल्लोष झाला. टाळ्यांचा कानठळ्या बसविणारा कडकडाट झाला.

आंद्रे मुराईस हा विश्वविख्यात लेखक महाराणीबद्दल काय बोलतो पहा–

' ज्युबिली साजरी होऊन अवघी तीनच वर्षे उलटली. आफ्रिका खंडाच्या टोकाच्या दोन प्रजासत्ताक राष्ट्रांनी, महा-

राणीच्या ह्या महाबलाढ्य ब्रिटिश साम्राज्याला धारेवर धरले. मान खाली घालायला लावली. बोअर युद्धाला तोंड फुटल्यावर लंडनमधले लोक, ह्या असमान सामर्थ्याच्या संग्रामाला फिदी-फिदी हसले. परंतु १९०० मध्ये लंडनमध्ये युद्धाच्या अप्रिय अशा वार्ता येऊ लागल्या. या अप्रिय वार्तांचा, महाराणीच्या मनावर अनिष्ट परिणाम झाला. ह्यावेळी तिचे वय ८१ वर्षांचे. तरी-सुद्धा युद्धाच्या आघाडीवर असलेल्या आपल्या सेनापतींना आणि सैनिकांना उत्तेजनपर पत्रे पाठवीत राहिली. युद्धाच्या आघाडीवर जायला निघालेल्या आपल्या सैनिकी तुकड्यांना शुभेच्छा व्यक्त करून निरोप देत राहिली. हॉस्पिटलमध्ये जाऊन युद्धात जखमी झालेल्या आपल्या सैनिकांची विचारपूस करीत राहिली. हात थरथर कापत असायचे. तरीसुद्धा ती पत्रे लिहायला कमी करीत नव्हती. पाय लटलट कापायचे तरीसुद्धा आघाडीवर जायला निघालेल्या सैनिकांना निरोप देण्याबाबत कुचराई करीत नव्हती. इतके करूनसुद्धा फ्रान्स आणि जर्मनी देशांतील वृत्तपत्रांनी तिच्यावर टीकेची झोड उठविली. तिच्यावर टीका व्हायची ती झालीच. ''

महाराणी आयर्लंडला भेट देऊन ' आलबर्टा ' ह्या बोटीने परत येऊ लागली. दि. १८ डिसेंबर ह्या दिवशी तिने इंग्लंडच्या किनाऱ्यावर पाय ठेवला, तेव्हा तिच्यामध्ये बराच बदल झालेला आढळला. आता ती पूर्वीसारखी सुदृढ आणि निरोगी राहिलेली नव्हती. हीरक महोत्सवाच्या प्रसंगी तिच्यात ताठरपणा, ऐट आणि रूबाब होता. पण आता तिच्यात साऱ्याचीच उणीव

भासली. आता वृद्धावस्थेच्या लक्षणांची तिच्यावर छाप पडलेली होती. तिच्या एका मुलाला ताबडतोब बोलावून घेण्यात आले. 'प्रिन्स ऑफ वेल्स' हा तिचा थोरला मुलगा. 'ड्यूक ऑफ कॅनॉट' हा तिचा दुसरा मुलगा. तो जर्मनीत होता. दुसरा एम्परर विल्यम हा तिचा पुतण्या. महाराणी मृत्युशय्येवर पडली असल्याची वार्ता सर्व संबंधितांना कळविण्यात आली.

इंग्लंड आणि जर्मनी ह्या दोन देशांत ह्यावेळी सलोखा राहिलेला नव्हता. वैमनस्य निर्माण झालेले होते. बोअर प्रेसिडेंट क्रूगर याने ब्रिटिशांचा हल्ला यशस्वीपणे परतवला म्हणून जर्मनीच्या कैसरने त्याला शाबासकीची तार पाठवलेली. हेच त्या वैमनस्याचे कारण ! त्या तारेला इतिहासात फारच महत्त्व प्राप्त झालेले आहे. परंतु दि. २२ जानेवारी १९०१ ह्या दिवशी हे चित्र साफ बदलले. जर्मनसम्राट आणि प्रिन्स ऑफ वेल्स, दोघे त्या दिवशी इंग्लंडच्या भूमीवर जोडीने चालत होते. कैसरच्या साऱ्या आयुष्यात इंग्लंडात त्याला एवढी लोकप्रियता कधीच लाभली नव्हती. तो आपल्या आजीबरोबर असताना लोक आनंदाने रडले. आजीचेही आपल्या नातवावरही तसेच प्रेम होते.

महाराणी व्हिक्टोरिया आपल्या घरी, 'आयझल ऑफ व्हाईट' येथे ख्रिस्तवासी झाली. तिचा मृतदेह शाही इतमामाने 'आलबर्टा' ह्या तिच्याच बोटीतून आणला जाऊ लागला. बोटीच्या दोन्ही बाजूंना युद्धनौका आणि क्रूझर्सचा तांडा. बोटीवर 'चॉपिन' संगीताच्या 'फ्युनरल मार्चचा' घोष. युद्धनौकांतल्या तोफा धडाडत होत्या. आठ मैलांचा समुद्र–मार्ग, युद्धनौकांनी व्यापलेला.

एक बडा अधिकारी उद्‌गारला–

" महाराणी मृत्यू पावली. "

त्यावर सातवा एडवर्ड उद्गारला–

" पण राजा जिवंत आहे. "

आजीचा दफनविधी आटोपल्यावर कैसर काही दिवस इंग्लंडमध्येच राहिला. इंग्लिश लोक तसे बरेच भावनाशील. कैसर जायला निघाला, तेव्हा त्यांना फारच वाईट वाटले. परंतु जर्मन लोक, तिकडे संतापाने धुमसत राहिलेले. कारण त्याने बोअर युद्धाचा विजेता फील्ड मार्शल रॉबर्टस् याला " ऑर्डर ऑफ दी ब्लॅक इगल " प्रदान केलेली.

" आता ह्यापुढे इंग्लंडचे कसे काय होणार ?" असा तरुण चर्चिलने प्रश्न केल्यानंतर सर विल्यम त्याला म्हणाले– " माझा अनुभव असा की, कधीच काही घडत नसते. "

१९०१ च्या जानेवारीमध्ये महाराणी व्हिक्टोरियाने ह्या जगाचा निरोप घेतला.

वाचनालय शाखा.
बा. क्र. १७०९ दिनांक ३।५।८९
विषय वा.वा क्र. ........

# कवयित्री एलिझाबेथ

१८४५ सालच्या जानेवारीतील एका थंडीच्या दिवशी, लंडनच्या विम्पोल स्ट्रीटमधील, ५० क्रमांकाच्या इमारतीतील पहिल्या मजल्यावर एक बुद्धिमान तरुणी एका कोचावर स्वस्थ पहुडलेली. हताश आणि निराश बनली होती ती. लहानशा नाजूक चणीची ती तरुणी. डोळे काळेभोर आणि पाणीदार भुवया. लांबलचक डोळ्यांखाली काळसर वर्तुळे. चेहरा ओढलेला. नि पांढरा फटफटीत. हातपाय लांबलचक. हे त्या विकलांग तरुणीचे वर्णन. ' व्हेलवेट ' कपड्यांत, छायेसारखी कोचावर पडलेली.

विकलांग असली तरीसुद्धा प्रतिभाशाली कवयित्री म्हणून तिचा बराच बोलबाला झालेला. बऱ्याच रसिकांना तिच्या काव्याने मोहिनी घातलेली. मात्र क्षीण प्रकृतीमुळे तिला जगाच्या खिडक्या बंद झालेल्या.

तिचे नाव एलिझाबेथ बॅरेट !

गेली सहा वर्षे आपल्या खोलीत ती कैद होऊन पडलेली. कैद म्हणजे घरातली कैद. तुरुंगातली नव्हे. तिचा श्वासोच्छ्वास आणि तिच्या कुत्र्याचा श्वासोच्छ्वास एवढाच काय तो त्या खोलीत अस्पष्ट आवाज. (तिच्या स्पॅनियल कुत्र्याचे नाव फ्लश)

बाकी सारे शांत शांत ! एक दिवस ते आक्रीत घडले.

त्या दिवशी, पोस्टमनने दारातूनच एक पत्र तिच्याकडे भिरकावले. पण ते पत्र तिच्या आयुष्यात क्रांती घडवून आणणारे ठरले. तिच्या शुष्क आयुष्याला ते पत्र, फुलोरा आणणारे ठरले.

कवयित्री एलिझाबेथला असंख्य रसिकांची अनेक खुषीपत्रे यायची. त्यांच्याशी ती फार मनोहर पत्रव्यवहार करायची. त्या खुषीपत्रांमुळे तिच्या वैराण वाळवंट बनलेल्या आयुष्यात थोडीशी हिरवळ निर्माण होई.

पण आज आलेल्या खुषीपत्राची मात्र बातच आगळीवेगळी. पोस्टाने आलेल्या त्या पत्रात कोणता मजकूर असणार याची तिला मुळीच कल्पना नव्हती. पण ते पत्र म्हणजे तिच्या कैद-खान्याला लावलेल्या कुलपाची सोनेरी चावी होती. तो दिवस तिच्या जीवनात सोन्याचा ठरला. इंग्लिश साहित्यसृष्टीत एक अमर भावपूर्ण असा रोमान्स– असा रोमँटिक पत्रव्यवहार रसि-कांना वाचायला मिळणार होता. विकलांग तरुणीला धट्टीकट्टी बनविणारा असा तो रोमान्स. दोन कविमनांचे मनोमीलन झाल्या-वर हा असा चमत्कार न घडून आला तरच नवल !

एलिझाबेथने त्या पत्राखालची सही पाहिली. " रॉबर्ट ब्राऊनिंग. " अधीर होऊनच तिने ते पत्र वाचले. " प्रिय मिस बॅरेट, तुझ्या काव्यावर मी मनापासून प्रेम करतो. तुझ्या त्या काव्याने माझे हृदय हेलावून टाकले आहे. तुझे काव्य थोर आहे. जिवंत आहे. जातिवंत आहे. तुझ्या काव्याच्या पुस्तकावरसुद्धा मी अगदी मनापासून प्रेम करतो. तुला जवळून पहाण्याची सुसंधी मला एकदा लाभली होती. आठवते तुला ? एका सुंदर सकाळी केनियन मला म्हणाले, " मिस बॅरेट ह्या कवयित्रीला भेटायला

आवडेल तुला ? पण तुझी प्रकृती ठीक नव्हती. म्हणून ते जमले नाही. तुझ्या काव्याने मला अपार आनंद दिला. अपरिमित समाधान लाभले तुझ्या काव्यामुळे. मला तुझा अभिमान वाटतो.

केवळ तुझाच–
रॉबर्ट ब्राऊनिग. "

पत्र-वाचनाने तिच्या अंगावर सुखाची शिरशिरी उठली. तिच्यावर तसा प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या त्या कवीला तिने जन्मात कधी पाहिले नव्हते. तेव्हा रॉबर्ट ब्राऊनिंगचे काव्य, तिच्या काव्याइतके रसिकप्रिय झालेले नव्हते. तरीपण त्याचे काव्य तिने कधी तरी वाचलेले होते. पत्र वाचल्यावर तिची अशी भावना झाली की ह्या कवीला आपण ओळखतो.

चटकन तिने आपली लेखणी शाईत बुडवली. रॉबर्ट ब्राऊनिंगला पत्र लिहायला सुरुवात केली– " प्रिय रॉबर्ट, तुमचे मी आभार मानते. केवळ औपचारिक नव्हे. अगदी मनःपूर्वक आभार. " तिने आपल्या पत्राचा समारोप केला. " हिवाळा सुरू झाला की, केवळ वनश्रीच नव्हे तर अवघी सृष्टीच गारठून जाते. मीसुद्धा तशीच गारठून जाते. परंतु हा हिवाळा संपेल आणि ऋतुराज वसंताचे आगमन होईल. मग धरणी अंगअंगाने फुलून मोहरून जाईल. तेव्हाच आपली दोघांची भेट होईल. शिशिर ऋतूचे निर्गमन म्हणजे वसंत ऋतूचे आगमन ! "

पुढे त्याच्या काव्याची थोडी स्तुती करून तिने खाली सही केली.

" तुमच्या कृपाप्रसादाला पात्र ठरलेली– एलिझाबेथ बॅरेट "

एका असाधारण आणि अद्वितीय पत्रव्यवहाराला ही अशी सुरुवात झाली.

व्हिक्टोरियाच्या काळात वावरणारी ती दोघे, तरीसुद्धा आपल्या पत्रांतून त्या दोघांनी आपल्या प्रेमाला वाचा फोडली. आजच्या काळालासुद्धा ते शोभून दिसेल. ह्या दोघांच्या पत्रांची, दररोज अथवा दर दोन दिवसांनी आवकजावक सुरू झाली. दोघांच्या प्रेमपत्रांची संख्या पाचशेत्र्याऐंशी एवढी भरते.

एलिझाबेथ ही जेवढी बंधनात, तेवढाच रॉबर्ट हा अगदी मुक्त. कॅम्बरवेल इथल्या एका शानदार घरात तो मातापित्यां-बरोबर आणि बहिणीबरोबर राहायचा. आपला सारा वेळ तो काव्यलेखन करण्यात खर्च करी. वाचनाचे त्याला भयंकर वेड. त्याचे पिताजी अनेक भाषांचे जाणकार. ग्रीक, फ्रेंच, इटालियन आणि स्पॅनिश ह्या चार भाषांचे ते पंडित. पिताजींना हा वारसा रॉबर्टला मिळालाच असावा. रॉबर्टला एकंदर समाजातसुद्धा मान मिळे. एका मुत्सद्द्याचा चिटणीस म्हणून त्याने रशियापर्यंतचा प्रवास केलेला. इटली देशाला तर त्याने दोनदा भेट दिलेली. जणू काय इटली ही रॉबर्टची दुसरी मातृभूमी.

एलिझाबेथशी पत्रव्यवहार सुरू करताना त्याच्यापुढे कोणतेच उद्दिष्ट नव्हते. त्याचे जीवन अगदी भरकटल्यासारखे झालेले. ध्येयाचा ध्रुवतारा नसल्यामुळे परिस्थितीच्या लाटांवर त्याची जीवननौका हेलकावे खात असलेली. परदेशात असताना एलिझाबेथ बॅरेट हिच्या काव्याचे दोन खंड त्याच्या हातात पडले. इंग्लंडमध्येच ते दोन्ही खंड प्रकाशित झालेले. त्यातील काव्याचा रसास्वाद घेऊन, त्याची मती गुंग झाली. मधुर मनोहर भाषा-सौष्टव. वेगळे संगीत– वेगळे विचार. अजूनपर्यंत त्याला असे वाटे की, कधीच कोणत्या तरुणीवर आपले प्रेम जडणार नाही. परंतु जिच्यावर जीवापाड प्रेम करता येईल अशी एक तरुणी

त्याला गवसली. त्याची खात्री झाली की, ह्या अफाट दुनियेत अशी एक तरुणी आहे की, जिच्यावर आपण प्रेम करू शकतो आणि जी आपल्यावर प्रेम करू शकेल. त्याला एक नवाच शोध लागला. त्याने तिला पत्र लिहिले– "प्रिय मिस बॅरेट, तुझ्या काव्यावर मी मनापासून प्रेम करतो." पण ह्यावेळी एलिझाबेथ ही कार्यक्षम राहिली नव्हती. ह्यावेळी ती हारफोर्डशावर इथल्या "होप एंड" नावाच्या घरात राहायची. एका समृद्ध कुटुंबातली ती मुलगी. "होप एंड" हे तिच्या पिताजींच्या मालकीचेच घर. पिताजींनी त्या घराला "आशा समाप्ती" हेच नाव दिलेले. असे विचित्र नाव त्यांनी आपल्या घराला का दिले, त्यांनाच ठाऊक !

आपल्या पिताजीबद्दल एलिझाबेथने लिहिलंय– "एडवर्ड मोल्टन बॅरेट ही एक अजब व्यक्ती. एक बडी इस्टेट त्यांच्या मालकीची. हॅरो आणि केम्ब्रिज ह्या विश्वविख्यात विद्यापीठांतून त्यांनी आपले शिक्षण पुरे केलेले. असे असूनसुद्धा ते आपल्या घरात एखाद्या हुकूमशहाप्रमाणेच वागत. पत्नीशी त्यांचे कधीच जमले नाही. घरात ते नेहमीच रागावलेले आणि संतापलेले. पतीपत्नींचे एकमेकांशी कधीच पटले नाही, तरीसुद्धा त्यांनी एक डझनभर मुलांना जन्म दिला. पूर्वी पत्नी पतीशी झगडायची परंतु डझनभर मुले झाल्यावर मात्र तिच्या अंगात झगडायचे त्राण उरले नव्हते. त्यांच्या बाराही मुलांपैकी एकाही मुलाच्या अंगात, त्यांच्याविरुद्ध जायची हिम्मत नव्हती. बारा मुलांचा बारदाना बापाने आपल्या मुठीत ठेवलेला.

घरातली परिस्थिती अशी असूनसुद्धा एलिझाबेथचे बालपण सुखातच गेले. आपल्या दादाबरोबर ती भटक भटक भटकली

तसाच तिने झटून अभ्यासही केला. त्यांच्यापाशी बसून ती ग्रीक आणि फ्रेंच भाषा शिकली. अनेक उत्तम पुस्तकांचे वाचन केले. काही शोकात्मक काव्ये लिहिली. पण तिच्या जीवनाची शोकांतिका, तिच्या वयाच्या पंधराव्या वर्षी सुरू झाली. त्यावेळी तिच्या छातीत बराच कफ झाला. फुप्फुसे आणि पाठीचा कणा, यांत काहीतरी बिघाड झाला. तिच्या विकलांग अवस्थेचे हेच मूळ कारण. त्यामुळेच ती बिछान्याला खिळली. याचसुमाराला तिच्या आईने ह्या जगाचा निरोप घेतला. पुढे चार वर्षांनी वडलांनी गावातले आपले घर विकून टाकले, आणि विम्पोल स्ट्रीटमधले ५० क्रमांकाचे घर घेतले. याच नव्या घरात, एलिझाबेथची तब्येत दिवसेंदिवस अधिकाधिक बिघडत गेली. हळूहळू तिच्या विकलांग अवस्थेची कुटुंबाला सवय पडून गेली. तिच्या इतर भावंडांना जेवढे स्वातंत्र्य नव्हते तेवढे तिला स्वातंत्र्य होते. कारण काकांनी तिच्या औषधोपचारासाठी काही रक्कम देऊन ठेवली होती. इतर साऱ्या भावंडांना पिताजींच्या कडक हुकुमाखाली रहावे लागे. साऱ्या भावंडांना घरात जपून वागावे लागे. त्यांनी एक कडक फर्मान काढलेले– "घरात कुणाही मुलाने अगर मुलीने लग्नाचे नाव बिलकूल काढायचे नाही." याचा अर्थ कुणाही मुलाने अगर मुलीने स्वतःच्या लग्नाचा मुळीसुद्धा विचार करायचा नाही. वडिलांच्या ह्या फर्मानाचा भंग करण्याची हिंमत एकाही मुलामध्ये नव्हती.

हेन्रीएटा नावाची एलिझाबेथची एक गोड छोटी बहीण. तिला पोलका डान्स हा फार आवडे. ह्या छोटीने आपला नवरा स्वतःच शोधून काढला. त्याच्याशी तिने लग्न करायचे ठरविले. परंतु पिताजींचा त्या लग्नाला सक्त विरोध. पिताजींच्या तशा

विरोधामुळे त्यांच्या घरात जे काय घडले, त्याचा एलिझाबेथच्या मनावर फार विपरीत परिणाम झाला. तिच्या मनोरथाचे तुकडे तुकडे झाले. तरीसुद्धा ती आपल्या पित्याशी प्रामाणिक राहिली. पित्याची अनियंत्रित सजा तिने मानली. परंतु तिच्या भोवतालच्या कैदखान्याचा बंदोबस्त अधिकच कडक झाला. याच अवधीत ज्या तरुणाला तिने कधी पाहिले नव्हते त्याच्याकडून तिला प्रेमपत्रे येतच राहिली. रॉबर्टचे पत्र हातात पडल्यावर ती अधिक आनंदी आणि उत्साही व्हायची.

वसंत ऋतू सुरू झाल्यावर तिने लिहिल्याप्रमाणे रॉबर्टने तिची भेट घ्यायचे ठरविले. एका पत्रात तिने त्याला लिहिले– " आता माझ्या जीवनात वसंत ऋतूचे आगमन होणार आहे. "

मे महिन्यात प्रियकर– प्रेयसीची प्रथम भेट झाली. त्या प्रथम भेटीबद्दल एलिझाबेथने एकच ओळ लिहून ठेवली. " रॉबर्ट, तू आलास तो इथून गेलासच नाही. "

रॉबर्टनेसुद्धा एकच ओळ लिहून ठेवली– " तुझ्या प्रेमात मी गळ्यापर्यंत बुडालोय. "

रॉबर्ट आठवड्यातून निदान एकदा तरी आपल्या प्रेयसीची भेट घेई. रॉबर्टच्या तशा भेटीमुळे तिला नवचैतन्य प्राप्त होई.

उन्हाळ्याच्या मध्यावर ती रॉबर्टबरोबर बाहेर फिरायलासुद्धा जाऊ लागली. ह्या सुमाराला एलिझाबेथने आपल्या वयाची चाळिशी गाठलेली होती. तरीसुद्धा ती पित्याच्या इच्छेला मान तुकवीत राहिली.

हुकूमशहा हा स्वतःच्याच कृतीने आपला पाडाव करून घेतो. त्याची दंडेली शेवटी त्याच्याच पराभवाला कारणीभूत होते, असा इतिहासाचा दाखला आहे. हिवाळा हा एलिझाबेथचा

कट्टा दुष्मन. लंडनमधली कडाक्याची थंडी तिला सहन होत नसे. हिवाळा सुरू झाल्यावर, एलिझाबेथने इटलीला जायचा बेत केला. तिच्या फॅमिली डॉक्टरांनीच तिला तसा सल्ला दिला. भावाने डॉक्टरांच्या त्या सूचनेला अनुमोदन दिले. आराबेल ही तिची धाकटी बहीण, तिच्याबरोबर इटलीला जायला निघाली. इटलीला जायला मिळणार म्हणून ती आनंदाने उड्या मारू लागली. परंतु अगदी ऐनवेळी, एडवर्ड पिताजींनी, एलिझाबेथच्या बेताला मोडता घातला. त्या गोष्टीला त्यांनी विरोध केला. इटलीला जायचा बेत तिला रद्द करावा लागला. पिताजीच्या तशा विरोधामुळे तिला कळून आले की, त्यांचे आपल्यावरील प्रेम आणि वात्सल्य हे केवळ वरवरचे आहे. त्यात त्यांचा स्वार्थ आहे. त्यांना मालकी हक्क गाजवायचा आहे.

एलिझाबेथने मग त्यांच्याकडे पाठ फिरविली. रॉबर्ट तिचा प्रियकर. तोच तिचा आधारस्तंभ ठरला. प्रियकराच्या प्रेमपत्राला ती आता सरळ सरळ रोख–ठोक उत्तरे देऊ लागली. तिच्या लेखणीतून निर्भेळ प्रेमाचा झरा वाहू लागला. रॉबर्ट आता तिला तिच्या घरातल्या " बा " ह्या नावानेच संबोधू लागला. परंतु अजूनही तिच्या मार्गातले सारे अडथळे दूर झालेले नव्हते. सर्वात मोठा अडथळा होता तो तिच्या क्षीण प्रकृतीचा !

पूर्वी भर उन्हाळ्यातसुद्धा आपला घराचा जिना उतरून ती कधी बाहेर गेली नव्हती. परंतु आता प्रियकराच्या प्रोत्साहनामुळे, हिवाळ्याच्या कडक थंडीतसुद्धा ती जिना उतरून खाली जाऊ लागली. रॉबर्टशी असलेले आपले प्रेमसंबंध पित्यापासून लपवून ठेवायचा ती आटोकाट प्रयत्न करीत असे. ते कळले असते तर त्यांनी रॉबर्टकडून तिला येणारी प्रेमपत्रे, तिच्या कधीच हाती

पडू दिली नसती. प्रेमपत्रे जाळून त्यांनी रॉबर्टला आपल्या घरी यायची बंदी केली असती. त्यांच्या प्रेम–प्रकरणाचा तसा शेवट झाला असता.

एलिझाबेथच्या मनावरील ताणतणाव वाढतच राहिले. ती अस्वस्थ बनली. तिचा आवडता स्पॅनियल कुत्रा " फ्लश " याला सुद्धा तिचा मनस्ताप जाणवला. एक दिवस तशा अस्वस्थ अवस्थेत, एलिझाबेथला भेटायला आलेल्या रॉबर्टच्या पायाला त्याने चावा घेतला. आणि " बा "च्या हातून कधी न मिळणारी थप्पडसुद्धा त्याला खावी लागली.

ह्या सर्व जंजाळातून सुटका करून घ्यायची म्हणजे दोघा प्रेमिकांनी लंडन सोडून इटलीला प्रयाण करणे हाच एकमेव उपाय. शिवाय आता वसंत ऋतूचे आगमन झालेले. पण तरीसुद्धा तिने तो आपला बेत पुढे ढकलला. रॉबर्टबरोबर बाहेर फिरायला जाण्याचे प्रमाण मात्र वाढविले. दोघे लंडनच्या रीजंट पार्कमध्ये फिरायला जात राहिली. विशेष म्हणजे एलिझाबेथ आता, तिच्या कुणा मैत्रिणीच्या घरी भेटायला जाऊ लागली.

सुदैवाने तिच्या पिताजींच्या हातून एक गोष्ट अगदी नकळत घडली आणि तीच गोष्ट नेमकी एलिझाबेथच्या पथ्यावर पडली. दि. १० सप्टेंबर रोजी, तिने आपल्या पत्रात कळविले– " काल रात्री हुकूमशहाचे एक नवे फर्मान बाहेर पडले." विम्पोल स्ट्रीटमधल्या त्यांच्या घराची दुरुस्ती करायची होती. म्हणून बॅरेट कुटुंबाने ते जुने घर रिकामे करायला हवे होते. रॉबर्टने ताबडतोब पत्र लिहून तिला कळवले– " जर का विम्पोल स्ट्रीटमधले जुने घर सोडून दुसरीकडे राहायला गेलीस तर मग आपल्या दोघांचे लग्न एक वर्षभर पुढे ढकलणे अशक्य. आपण

इतके दिवस थांबलो. पण तशा थांबण्याने आपण काय मिळवले ? ते तुला ठाऊकच आहे. आता आपण दोघांनी ताबडतोब लग्न करायला हवे. मधुचंद्र साजरा करायला आपण इटलीला प्रयाण करायला हवे. आज मी लायसन्सची व्यवस्था करतो. ह्या शनिवारी आपण दोघे कायदेशीर पतीपत्नी होऊ या."

एलिझाबेथ आता धीट बनलेली. ती मुळीच गांगरली नाही. ठरलेल्या शनिवारी आपली नोकराणी विलसन हिला घेऊन घरातून बाहेर पडायचा तिने बेत केला. मैत्रिणीला भेटायचे निमित्त करून ती घराबाहेर पडली. त्यामुळे घरच्या कडक पहाऱ्यातून तिची अगदी बिनबोभाट सुटका झाली.

दि. १२ सप्टेंबर १८४६ रोजी, एलिझाबेथ आपली नोकराणी विलसन हिच्यासह विम्पोल स्ट्रीटमधल्या घरातून बाहेर पडली. तिची मुद्रा प्रसन्न होती परंतु अर्ध्या वाटेवरच आपल्याला मूर्च्छा येत आहे असे तिला वाटले. विल्सनने जवळच्या दुकानातून 'स्मेलिंग सॉल्ट' आणून तिला हुंगवले. रॉबर्ट त्याच्या चुलत बहिणीबरोबर, तिची वाट पहात चर्चच्या दारात उभा होता. तिला आलेली पहाताच त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. ती इतकी धीट बनेल अशी त्याला खात्री वाटत नव्हती.

चर्चमधले अनेक विवाहविधी पार पाडताना, एलिझाबेथला अगदी थकवा आला. लग्न आटोपून थकल्या–भागल्या अवस्थेत ती आपल्या घरी परत आली. आता पुढली पायरी म्हणजे घरातून थेट इटलीला पळून जायचे. लग्न तर झालेलेच होते. आपल्या अंगात अधिक ताकद यायला हवी असा तिने विचार केला.

जुन्या घराची दुरुस्ती म्हणून नव्या घरात सामानसुमान

हलवायला हवे होते. जुन्या घरातील सामानाची बांधाबांध सुरू झाली. मोठमोठे डाग घरातून नव्या घरात हालवले जाऊ लागले. एलिझाबेथला आपल्या सामानाचे वेगळे पॅकिंग करायला ही फारच नामी संधी मिळाली. सामानासह ती त्या घरातून आता पळ काढणार होती. पित्याला त्याचा सुगावा लागू नये म्हणून काळजी घ्यायची होती. रॉबर्ट आता तिचा पती. तिला भेटायला आता तो तिच्या घरी येणार नव्हता.

घरातून पळून जाताना, पित्यासाठी मागे ठेवायचे पत्र लिहिण्यात एलिझाबेथ गुंतली. त्या पत्राने तिच्या पित्याला जबर धक्का बसणार होता. अजूनही ती पित्याकडून क्षमेची अपेक्षा करीत होती. पण तिची ती अपेक्षा फोल ठरणार होती. तिने आपल्या तयार केलेल्या बॅगा आणि पेट्या गुपचूप पुढे पाठवल्या. बॅगा आणि पेट्या नव्या जागेत गेल्या असा तिने बहाणा केला. तिच्या विवाहाला एक आठवडा पूर्ण झाला होता.

दि. १९ सप्टेंबर रोजी, ती आपली विश्वासू नोकराणी विल्सन हिच्याबरोबर जुन्या घराच्या पायऱ्या उतरली. पित्याच्या घराचा तिने शेवटचा निरोप घेतला. " फ्लश " कुत्र्याला तिने आपल्याबरोबर घेतलेले. कुत्र्याला मागे ठेवला असता तर खाष्ट पित्याने मुलीचा राग त्या बिचाऱ्या कुत्र्यावर काढला असता. गळा दाबून त्याचा प्राण घ्यायलासुद्धा कमी केले नसते. जवळच्याच एका ग्रंथभांडाराजवळ रॉबर्ट तिला भेटला. रेल्वे स्टेशनला जायला त्या तिघांनी एक टॅक्सी पकडली. पतीपत्नींच्या इटली प्रयाणाला प्रारंभ झाला.

एलिझाबेथ स्वतंत्र झाली. तिच्या नव्या वैवाहिक जीवनाला प्रारंभ झाला. पॅरिस, पिसा, फ्लॉरेन्स, रोम ! असा पुढचा

प्रोग्राम. आता ती निरोगी आणि धडधाकट बनलेली.

सन १८४९ च्या वसंत ऋतूमध्ये तिने एका पुत्र–रत्नाला जन्म दिला. पुढ्यातला सुंदर सुपुत्र पाहून तिचा आनंद द्विगुणित झाला. अधूनमधून ती इंग्लंडलासुद्धा जाऊन आली. परंतु आपल्या पिताजींना भेटायचे धैर्य काही तिला झाले नव्हते. त्यांना तिने जी पत्रे पाठवली ती पत्रे न फोडता जशीच्या तशी तिच्याकडे परत आली. जणू काय लग्न करायचा महान अपराधच तिच्या हातून घडला होता. त्या अपराधाबद्दल क्षमा करायची त्यांची तयारी नव्हती. पितृप्रेमाला ती कायमचीच पारखी झाली.

सन १८६१ पर्यंत रॉबर्टने मात्र तिच्यावर प्रेमाचा सतत वर्षावच केला.

फ्लॉरेन्स ह्या शहरी असताना जून महिन्यातल्या एका संध्याकाळी, एलिझाबेथला आकस्मिक ब्राँकायटिसचा झटका आला. तिची प्रकृती फारच बिघडली. रॉबर्टने तिला आपल्या बाहुपाशात घेतली. तिला धीर द्यायचा प्रयत्न केला. डॉक्टरांना बोलावण्याची धावाधाव केली.

राबर्ट ब्राऊनिंगने लिहून ठेवलंय–

" एलिझाबेथ माझ्या बाहुपाशात होती. तिचे डोके माझ्या गालावर होते. सदैव हसतमुख. सुखात बुडालेली निरागस, निष्पाप अजाण मुलीसारखीच तिची मुद्रा. काही मिनिटांतच तिने शेवटचा श्वास सोडला. "

एका प्रतिभासंपन्न कवयित्रीने ह्या जगाचा असा निरोप घेतला. परंतु तिचे काव्य आणि तिची प्रेमपत्रे अमर झाली.

# संशोधक मारी क्युरी

पोलंडमध्ये असताना मारी क्लोडोव्हस्की याच नावाने ती ओळखली जाई. तिथल्या एका धनाढ्याकडे काम करून तिने पैसा जमा केला आणि पुढचे उच्च शिक्षण घ्यायला ती फ्रान्स-मधील पॅरिस शहरी आली. तुटपुंजा पैसा जवळ असल्यामुळे तिला इथे अपुरा आणि अपौष्टिक असाच आहार घ्यावा लागे. मग ती दुबळी बनली. नुसती उभी राहिली तरी तिचे डोके गरगर फिरायचे. ती शिक्षण घेत राहिली. सव्वीस वर्षांचे वय झाले तरी तिने ठरवले की, प्रेम आणि विवाह ह्या गोष्टींना आपल्या जीवनात स्थान नाही.

परंतु पिअरे क्युरी ह्या एका फ्रेंच तरुणाचा तिच्या जीव-नात अचानक प्रवेश झाला. शास्त्रीय संशोधनात तो आरपार बुडालेला. वयाची पस्तिशी त्याने गाठलेली. पण बुद्धीचे तेज त्याच्या चेहऱ्यावर दिसून येई.

मारी आणि पिअरे ह्या दोघांची प्रथम भेट १८९४ साली झाली. दोघे कॉलेजच्या प्रयोगशाळेत भेटली. आणि त्यांना पर-स्परांबद्दल सहानुभूती वाटली. मारीच्या बुद्धिमत्तेचे त्याला फार कौतुक वाटले. तिच्या तोंडची शास्त्रीय भाषा ऐकून तो अगदी

चकित होई. दोघांचा परिचय वाढला. तो तिच्या खोलीवर भेटायला आला. खोलीत काहीच सामान नव्हते. केवळ पुस्तकांचा ढीग आणि दोरीवर टांगलेले दोन तीन साधे सुती झगे. बस्स ! परंतु तिची जिद्द जबरदस्त. तिचे असामान्य धैर्य आणि उमदा स्वभाव ह्यामुळे तो अधिक प्रभावित झाला. कांही महिने लोटले आणि त्याने तिला विचारले–

" मारी, तू माझी स्वामिनी होशील काय ? " परंतु तो पडला फ्रेंच आणि ती पडली पोलिश ! आपल्या मायदेशापासून-पोलंडपासून तिची ताटातूट होणार होती. त्याच्या प्रेमाच्या जाळ्यात ती अडकलेली. त्याच्याकडे तिचे मन ओढ घेत राहिलेले. काय करावे प्रथम तिला समजेना. पुऱ्या दहा महिन्यांनंतर त्याच्याशी विवाहबद्ध होण्याचा आपला विचार तिने पक्का केला आणि दोघांचा विवाह झाला.

ह्या जोडप्याने प्रथम आपला संसार थाटला तो एका लहानशा फ्लॅटमध्ये. त्या फ्लॅटच्या भिंती, पुस्तकांच्या ढिगांनी भरलेल्या. घरातले फर्निचर म्हणजे दोन खुर्च्या आणि एक टेबल. टेबलावर सायन्स विषयावरची पुस्तके पसरलेली. एक फुलदाणी आणि फुलदाणीत फुलांचा गुच्छ. स्वयंपाकासाठी मारी, प्रयोग-शाळेतल्या " बर्नर "चा उपयोग काटकसरीने करी.

वैवाहिक जीवनाच्या दुसऱ्याच वर्षी, मारी प्रसूत झाली. एका कन्यारत्नाला तिने जन्म दिला. कन्येचे नाव तिने "इरीन" ठेवले. घरकाम करीत बसायचे की प्रयोगशाळेत जायचे हा प्रश्न तिच्यापुढे नव्हता. पुढे काय करायचे ते तिने ठरवूनच टाकलेले.



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
बा. क्र. ९८८५ दिनांक ३।५।८९
विषय क्र.

१८९७ साल संपले, तेव्हा मारीने विद्यापीठाच्या दोन पदव्या संपादन केल्या होत्या. फेलोशिप मिळवली होती. शिवाय एक मोनोग्राफ पण तिने तयार केला होता. पण ती संतुष्ट नव्हती. तिला डॉक्टर व्हावयाचे होते. याच सुमारास एका फ्रेंच शास्त्रज्ञाचे एक महत्त्वाचे पुस्तक प्रकाशित झाले. युरेनियम साल्टस्‌संबंधी, हेन्री विकारेल ह्या शास्त्रज्ञाने केलेल्या संशोधनावरचे ते पुस्तक. त्याच्या त्या संशोधनाने मारी बरीच प्रभावित झाली. त्याच्या त्या संशोधनाला मारीने पुढे " रेडिओ ॲक्टिव्हिटी " असे नाव दिले. परंतु " रेडिएशन " हा प्रकार तोपर्यंत स्पष्ट झालेला नव्हता. तो एक आकर्षक विषय होता. त्यासाठी संशोधनाचे दीर्घ परिश्रम करण्याची आवश्यकता होती. बऱ्याच अडचणी येण्याचा संभव होता. त्या बिकट संशोधनाचे काम मारीने आपल्या अंगावर घेतले. " स्कूल ऑफ फिनिक्स " मध्ये तिचे पती पिअरे क्युरी अध्यापनाचे काम करीत. त्या स्कूलने तिला तशी संधी देण्याचे मान्य केले. तेथे संशोधन करणे फार बिकट. तळमजल्यावरच्या एका स्टोअर्सची खोली तिला, प्रयोग करण्यासाठी देण्यात आली. तिथले हवामान प्रयोगाच्या साधनांना बाधक असे होते. तरीसुद्धा तिने तेथेच आपल्या प्रयोगांना सुरवात केली.

'युरेनियम' प्रकाश किरणांचा मारी ही अभ्यास करू लागली. तिला कळून चुकले की, " थोरियम " ह्या मूलद्रव्याकडून सुद्धा तसलेच किरण बाहेर फेकले जातात. पिअरे मारीच्या संशोधनकार्यात साहाय्य करू लागले. पतीपत्नी दोघे प्रयोग करीत राहिली.

१८९८ साली डिसेंबर महिन्यात ह्या जोडप्याच्या परिश्रमाला फल प्राप्त झाले. त्यांचे प्रयोग यशस्वी झाले. त्यांनी एका

रासायनिक मूलभूत द्रव्याचा शोध लावला. त्याचे नाव ' **रेडियम.** ' रेडियम हा पदार्थ, तोपर्यंत अवघ्या जगात कुणीच कधी पाहिलेला नव्हता. अणू परिमाणात रेडियमचे वजन किती ते मग कुणाला ठाऊक असणार ? पोलोनियम आणि रेडियम यांचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी, त्या क्युरी जोडप्याला आणखी परिश्रम करावे लागले.

आपल्या प्रयोगासाठी आवश्यक असलेला एक पदार्थ, क्युरी दांपत्याने ऑस्ट्रियन सरकारकडून मोठ्या परिश्रमाने मिळविला. त्यांच्या प्रयोगात त्या पदार्थाला बरेच महत्त्व होते. तो पदार्थ एक टन वजनाचा होता. आता ती छोटी खोली त्यांना अगदीच अपुरी ठरली. शेजारीच एक शेड रिकामी पडलेली होती. त्या शेडमध्येच ह्या दांपत्याने आपले प्रयोग सुरू केले. साऱ्या दिवसभर, मारी भट्टीवर ठेवलेले कढईतले रसायन, लोखंडी दांड्याने ढवळीत बसलेली असायची. दिवस संपला की. तिला असा थकवा यायचा बोलता सोय नाही. १८९८ ते १९०२ ह्या चार वर्षांच्या काळात क्युरी दांपत्याने ही अशी ढोरमेहनत केली. त्या दोघांनी ह्या अशा प्रयोगापायी, आपल्या रक्ताचे पाणी आणि हाडाची काडे केली. मारीच्या अंगातल्या फ्रॉकवर धुळीची पुटे चढलेली असायची. ॲसिडचे लहानमोठे डाग पडलेले असायचे. शेडमधल्या धुराने तिचे डोळे चुरचुरत असायचे. डोळ्यांतून सारखे पाणी गळायचे. तरीसुद्धा ह्या महत्त्वाच्या संशोधनापुढे तिने आपल्या जिवाची कधी पर्वा केली नव्हती.

शेवटी १९०२ मध्ये, रेडियमच्या अस्तित्वाची घोषणा केल्यावर, बरोबर पंचेचाळीस महिन्यांनी, मारी क्युरीचा तो प्रयोग पूर्णपणे यशस्वी झाला होता. रेडियमचे ॲटॉमिक वेट-

रेडियमचे अणुपरिमाणात वजन करता येऊ शकेल अशा शुद्ध '**रेडियमचा**' मारी क्युरीने एक डेसीग्राम तयार केला होता. रेडियमचे अस्तित्व आता संशयातीतरीत्या– अधिकृतरीत्या सिद्ध झाले !

परंतु ह्या दांपत्याच्या गृहपरिस्थितीचे काय ? पिअरेचा फिनिक्स स्कूलमधला मासिक पगार अवघा ५०० फ्रॅन्क्स. इवीन ह्या मुलीसाठी त्यांना वेगळी नर्स ठेवावी लागली. तिच्या पगाराचा बोजा त्यांच्या अंगावर पडलेला. अधिक पैसा कमविण्यासाठी काहीतरी नवा मार्ग शोधून काढायला हवा होता.

सारबोन विद्यापीठात, १८९८ साली फिजिक्स केमिस्ट्री विषयातली, एक जागा ( चेअर ) रिकामी झालेली. ती चेअर आपण मागायची असे पिअरे क्युरीने ठरविले. त्या चेअरचे वर्षाला १०,००० फ्रँक्स मिळणार होते. तेथे शिकवायचे तास बरेच कमी होते. परंतु पिअरेने त्या चेअरसाठी केलेला अर्ज, विद्यापीठाने झिडकारला. पिअरेला प्रोफेसरची जागा १९०४ साली मिळावयाची होती. तोपर्यंत त्याला खालच्या एका हलक्या जागेवर काम करावे लागणार होते. पण सुदैवाने तेवढ्यात व्हर्सेल्स जवळच्या एका मुलींच्या कॉलेजात मारी क्युरीला प्रोफेसरची जागा मिळाली. अध्यापनाच्या कामात क्युरी पतीपत्नी, बिलकूल कुचराई करीत नव्हती. विद्यादानाचे काम ती दोघे अगदी प्रामाणिकपणे करीत राहिली.

अध्यापन आणि संशोधन अशा दोन कामांच्या ओढाताणीत दोघांना पुरेसा आहार घेता येत नव्हता की, त्यांना पुरेशी झोपसुद्धा मिळत नव्हती. पुरेशा विश्रांतीचे तर नावच काढायला नको. संशोधनाच्या कामापुढे त्या दोघांना जेवणाचा आणि झोपण्याचा

विसरच पडे. संशोधनाचे प्रयोग साऱ्या दिवसभर उभ्या उभ्याच करावे लागायचे. मग रात्री बिछान्यावर अंग टाकल्यानंतर पिअरे-च्या पायांना कळा लागायच्या. मारीला त्या कळांवर उपचार करावे लागायचे. ह्या अशा परिस्थितीमुळे मारीच्या मनावर बरेच ताणतणाव आलेले असायचे. तिचा फिकट पडलेला चेहरा बघून, मैत्रिणींना फारच काळजी वाटायची.

'**क्लोराईन**'चे शुद्धीकरण केल्यावर, रेडियम ही वस्तू मळकट मिठासारखीच दिसू लागायची. जणू काय स्वयंपाकघरातले मीठच परंतु ह्या भुकीचे गुणधर्म, शास्त्रज्ञांनासुद्धा तोंडात बोट घालायला लावणारे होते. त्याचे '**रेडिएशन**' म्हणजेच प्रकाश किरण फारच प्रखर होते. युरेनियमच्या वीस लक्ष पट इतके तीव्र आणि प्रखर. ते किरण फक्त शिशाचा जाड पडदा मध्ये आडवा आला तरच त्याला भेदून पलीकडे जाऊ शकत नव्हते. रेडियमची सर्वांत मोठी आणि मोलाची कामगिरी म्हणजे मानवजातीचा कट्टर शत्रू म्हणजे '**कर्करोग**'– त्या असाध्य आणि भयानक रोगाशी सामना करायला रेडियमचा उत्तम उपयोग होणार होता.

रेडियम उद्योगाचा नव्याने जन्म झाला. रेडियम अॅक्टिव्ह मानीचे (ORE) प्रयोग अनेक देशांत सुरू झाले. अमेरिका आणि बेलजियम ह्या दोन देशांत तसले प्रयोग मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. परंतु '**रेडियम**' हा धातू शोधून काढायची प्रक्रिया त्या इंजिनिअर लोकांना ठाऊक नव्हती. ती प्रक्रिया त्यांना ठाऊक व्हायला हवी होती. 'रेडियम' मिळाला की त्याची किंमत प्रचंड होणार होती.

एका रविवारी, पिअरेने मारीला नव्याने शोध लागलेल्या 'रेडियम' धातूचे गुणधर्म समजावून सांगितले. अमेरिकेतील

काही तंत्रज्ञांना, रेडियमचा उपयोग करून पाहचचा होता. त्यासाठी त्यांनी पिअरेला पत्र पाठवून, रेडियमचे गुणधर्म विचारले होते. ते पत्र मिळाल्यावर पिअरेने आपल्या पत्नीशी रेडियमच्या गुणधर्मांची चर्चा केली.

" शुद्धीकरणाच्या बाबतीत आपल्यापुढे दोन पर्याय आहेत." पिअरे सांगू लागला.

" अर्थातच. ते अगदी स्वाभाविक आहे. " मारी पुटपुटली.

" दुसरे असे, " पिअरे बोलू लागला. " आपण स्वतःला 'रेडियम ' ह्या नव्या धातूचे संशोधक म्हणवून घ्यायला हवे. आणि जगात रेडियम उत्पादन करण्याचे सारे अधिकार, आपल्याकडेच ठेवायला हवेत. '

ह्यावर मारी क्षणभर विचारात पडली. आपला विचार पक्का झाल्यावर ती म्हणाली.

' छे छे ! ते योग्य होणार नाही. तसे करणे हे सायंटिफिक स्पिरिटच्या विरुद्ध होईल. '

तिच्या तोंडचे हे शब्द कानी पडल्यावर, पिअरेचा चेहरा एकदम उजळला. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकले. मारीला तो सांगू लागला,

" तुझेच म्हणणे ठीक आहे. मग रेडियम तयार करण्याची सारी रीत मी त्या अमेरिकन इंजिनियर्सना कळवतो. अवघ्या मानवजातीला रेडियमचा जर का फायदा होणार असेल तर ती रीत आपण गुप्त कशाला ठेवायची ?'

१९०३ साली रॉयल इन्स्टिटयूटने पिअरे क्युरी यांना 'रेडियम ' ह्या विषयावर भाषण देण्यासाठी, अधिकृतरीत्या आमंत्रण दिले. हे त्यांचे भाषण लंडनमध्ये व्हावयाचे होते.

रडियम ह्या नव्या धातूचे जन्मदाते कोण आहेत– त्यांना पाहण्यासाठी लंडनवासीयांना फारच उत्सुकता लागून राहिली.

त्याच सालच्या नोव्हेंबर महिन्यात, लंडनच्या रॉयल सोसायटीने पिअरे आणि मारी क्युरी ह्या दोघांनाही अत्युच्च असे "डेव्ही पदक" प्रदान करून त्यांचा बहुमान केला.

दि. १० डिसेंबर १९०३ ह्या दिवशी, स्वीडनमधील स्टॉकहोमच्या सायन्स अॅकॅडमीने, त्याचवर्षी, "फिजिक्स" विषयातले 'नोबेल पारितोषिक' त्या दोघांना प्रदान करण्यात आले. नोबेल पारितोषिक हे सोन्याच्या सत्तर हजार फ्रॅंक्सचे आहे. त्याचा स्वीकार करून, 'सायंटिफिक स्पिरिटला' कोणताच बाध येणार नव्हता. दोघांनी त्या पारितोषिकाचा स्वीकार केला.

क्युरी कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारल्यावर, मारीने पिअरेला प्राध्यापकाची नोकरी सोडायला लावली. परंतु मारीने स्वत: मात्र आपली प्राध्यापकाची नोकरी सोडली नव्हती. आपली नोकरी तिने चालूच ठेवली.

नावलौकिक, कीर्ती, प्रसिद्धी ह्या साऱ्याच गोष्टी, आता त्या दोघांच्या हात धुऊन पाठीशी लागल्या. अभिनंदन–पत्रांचा आणि तारांचा त्यांच्या टेबलावर नुसता खच पडला. वृत्तपत्रांतून त्या दोघांवर हजारो लेख प्रसिद्ध झाले.

दुसऱ्या प्रसूतीच्या वेळी, मारी ही फारच थकलेली होती. १९०४ सालच्या डिसेंबर महिन्याच्या सहा तारखेला, क्युरी दांपत्याला दुसऱ्या कन्यारत्नाचा लाभ झाला. त्या मुलीचे नाव त्यांनी 'इव्ह' ठेवले.

प्रसूतीनंतर थोड्याच अवधीत मारी कॉलेजातील आपल्या अध्यापनाच्या कामावर जाऊ लागली. पुन्हा ती प्रयोगशाळेतील

एकमताने सारबोन विद्यापीठातील पिअरे क्युरीची ती ' चेअर ' मारी क्युरीला देण्यात आल्याची घोषणा केली. फ्रेंच शास्त्रीय क्षेत्रामध्ये एवढे मोठे आणि इतके उच्च पद प्रथमच एका स्त्रीला देण्यात आले. एका स्त्रीचा फ्रान्स देशात अगदी प्रथमच हा एवढा मोठा बहुमान करण्यात आला.

१९११ साली, स्वीडनने मारी क्युरीला त्या वर्षीचे रसायन विषयाचे ' नोबेल पारितोषिक ' प्रदान केले. एकाच व्यक्तीला दोन वेळा, नोबेल पारितोषिक मिळाल्याची ही अशी अद्वितीय आणि असामान्य घटना, निदान पुढील पन्नास वर्षे तरी कधी घडणार नव्हती.

सारबोन आणि पाश्चर ह्या दोन विद्यापीठांनी ' क्युरी इन्स्टिटयूट ऑफ रेडियम ' ह्या एका नव्या शास्त्रीय संस्थेची स्थापना केली.

पोलंड देशाची राजधानी वॉरसा येथे मारीच्या नावाची एक रेडियम संस्था स्थापन करण्यात आली. ' मारी क्लोडोव्हस्की-क्युरी इन्स्टिटयूट. "

अमेरिकन महिलांनी मारीला एक ग्राम रेडियम देण्यासाठी डॉलर्सची जमवाजमव केली. मारीसाठी डॉलर्स जमविण्याची त्यांची ही दुसरी खेप.

१९२९ सालच्या ऑक्टोबर महिन्यात, १९२१ सालची पुनरावृत्ती. मारी पुन्हा एकदा न्यूयॉर्कला जायला निघाली. पोलंडमधील रेडियम संस्थेसाठी अमेरिकन महिलांनी जे डॉलर्स जमवले त्यासाठी पोलंडतर्फे ती त्यांचे आभार मानणार होती. ह्या खेपेला, मारी अमेरिकेचे प्रेसिडेंट हूव्हर यांचीच सन्माननीय पाहुणी बनली. व्हाईटहाऊसमध्येच तिचा पाहुणचार करण्यात

आला. व्हाईट हाऊस राजवाड्यात ती बरेच दिवस राहिली.

रेडियम हाताळताना फारच काळजी घ्यायला हवी ही गोष्ट शास्त्रज्ञांच्या मनावर तिने वारंवार बिंबवली. 'आपल्या हातांना रेडियमचा बिलकूल स्पर्श होऊ देऊ नका. त्यासाठी चिमट्याचाच वापर करा. रेडियम ही साधी वस्तू नाही. रेडियमचा किरणोत्सर्ग फारच हानिकारक आहे ही गोष्ट लक्षात ठेवा.' अशा प्रकारे इतर शास्त्रज्ञांना धोक्याचा इशारा देणाऱ्या मारी क्युरीने आपल्या आयुष्यातली मोलाची पस्तीस वर्षे केवळ रेडियम आणि रेडियमच हाताळला. त्यामुळेच तिच्या अंगातले रक्त ॲबनॉर्मल बनले. आपल्या अंगातील रक्ताची तपासणी करून घ्यायला तिने साफ नकार दिला. पहिल्या महायुद्धाला सुरुवातीच्या वर्षात 'रोटेनजेन' ह्या साधनाच्या भयानक किरणोत्सर्गाचा तिच्या प्रकृतीवर अगोदरच परिणाम झालेला. मारीने अनेक धोके पत्करले. आणि तसे धोके पत्करल्यामुळे तिच्या रक्तात अधिकच बिघाड झाला. हातांना चटके बसले. हातांना डाग पडले. परंतु तिने त्याची बिलकूल पर्वा केली नव्हती. आपल्या ध्येयाला ती अगदी घोरपडीसारखीच चिकटून बसली होती.

इन्फ्लुएंझाचा बारीक ताप तिच्या अंगात मुरला. परंतु तिने मुळीच लक्ष दिले नव्हते. ह्या सर्वांचाच परिणाम होऊन, १९३४ सालच्या मे महिन्यात मारी क्युरी बिछान्याला खिळली. इन्फ्लुएंझा तापाने तिला पछाडले. त्या तापाने मग तिचा पिच्छा सोडलाच नाही. शेवटी तिची फुफ्फुसे काम करीनाशी झाली. आणि श्वासोच्छ्वास बंद झाला. ज्या रेडियमचा तिने शोध लावला, त्याच रेडियमने तिचा बळी घेतला.

शुक्रवार दि. ६ जुलै १९३४ ह्या दिवशी मारी क्युरी ही महान संशोधक अनंतात विलीन झाली. तिच्या नश्वर देहाचे, तिचा पती पिअरे याच्या शेजारीच दफन करण्यात आले.

रेडियमने तेजस्वी बनविलेले जीवन अखेरी काळाच्या पड्द्याआड झाले !

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
बाल वाङ्मय [illegible]
वा. क्र. ९७८५ दि. ३।५।८५
विषय [illegible] क्र.

BVBK-0401795

## बाल / कुमार वाङ्मय

सरदार भगतसिंग
चंद्रशेखर आझाद
नेताजी सुभाषचंद्र बोस
महाराणा प्रताप
स्वामी विवेकानंद
महात्मा ज्योतिराव फुले
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
झाशीची राणी लक्ष्मीबाई
नेपोलियन बोनापार्ट
सर विन्स्टन चर्चिल
सर गॅरी सोबर्स
पावसाचं घर
पंचधारा
शोधसप्तर्षि

मीनल प्रकाशन, कोल्हापूर